<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : २०/०८/२०१४

## मा.सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत

सभा क्रमांक १५, दिनांक २०/०८/२०१४
सभा सूचना क्रमांक ०५, दिनांक ११/०८/२०१४
सभा क्रमांक ०२, दिनांक २०/०८/२०१४

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २०/०८/२०१४रोजी सभा सूचना क्रमांक ०५, दिनांक ११/०८/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा ठिक ११.४५ वाजता तहकूब झाल्याने सदरची सभा त्याच दिवशी त्याचठिकाणी दुपारी ठिक १२.०५ मिनिटांनी पुर्ववत सुरु करण्यात येते.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

<u>सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य खालील प्रमाणे :-</u>

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील - महापौर.**
**२) श्री.मुकेश मधुकर मोकाशी - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरज प्रगती भारत | ४ | नरेश रतन मणेरा |
| ५ | मढवी बिंदू महेंद्र | ६ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ७ | श्री साप्ते राजेंद रमेश | ८ | मधुकर रामचंद्र पावशे |
| ९ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | १० | भोईर संजय देवराम |
| ११ | स्नेहा अंकुश पाटील | १२ | मोरे संजय भाऊराव |
| १३ | उषा संजय भोईर | १४ | चव्हाण सुधाकर वामन |
| १५ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १६ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १७ | चव्हाण तेजस्विनी किरण | १८ | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| १९ | संभाजी धोंडिराम पंडीत | २० | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २१ | राधा फत्तेबहादूर सिंह | २२ | राजकुमार रामनयन यादव |
| २३ | जाधवर राधाबाई सुभाष | २४ | सरैय्या अमित जयसिंग |
| २५ | पाटील वर्षा वसंत | २६ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २७ | सरनाईक परिषा प्रताप | २८ | सरनाईक विहंग प्रताप |
| २९ | भोईर विमल अर्जून | ३० | पांडे संजय श्रीनाथ |
| ३१ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३२ | पाटील शारदा विजय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | लासे विजया मनोज | ३४ | गौरी अनिता सुनील |
| ३५ | पाटील उमेश काशिनाथ | ३६ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ३७ | देसाई सुहास सुर्यकांत | ३८ | महेश्वरी संजय तरे |
| ३९ | नंदा कृष्णा पाटील | ४० | वडवले संतोष वसंत |
| ४१ | कणसे निर्मला शरद | ४२ | वैती अशोक बारकू |
| ४३ | बोरीटकर प्रभा अशोक | ४४ | तायडे रामभाऊ महादेव |
| ४५ | भोईर एकता एकनाथ | ४६ | आशा बाबासाहेब कांबळे |
| ४७ | जितेंद्र प्रभाकर वाघ | ४८ | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| ४९ | शिंदे मनोज तुकाराम | ५० | घाडीगांवकर संजय पांडुरंग |
| ५१ | काशिराम गोविंद राऊत | ५२ | खताळ विशाखा मधुकर |
| ५३ | मोरे संध्या सुनिल | ५४ | संखे मिनल मुकूंद |
| ५५ | जानकर योगेश तातोबा | ५६ | म्हस्के नरेश गणपत |
| ५७ | वेतकर दिपक विजय | ५८ | पाटील सुजाता भास्कर |
| ५९ | भोसले नम्रता दिपक | ६० | नारायण शंकर पवार |
| ६१ | हिराकांत बेंडू फर्डे | ६२ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६३ | मोरे रुचिता राजेश | ६४ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६५ | सोनार सारिका संजय | ६६ | वाघ पुजा गणेश |
| ६७ | महेश सुरेश वाघ | ६८ | वहिदा मुस्तफा खान |
| ६९ | नजीब सुलेमान मुल्ला | ७० | मनिषा महेश साळवी |
| ७१ | साळवी अपर्णा मिलींद | ७२ | पाटील मिलींद भारत |
| ७३ | महेश जगन्नाथ साळवी | ७४ | केणी मुकूंद बाळू |
| ७५ | पाटील मनाली मिलींद | ७६ | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ७७ | केणी प्रमिला मुकूंद | ७८ | सामंत विलास शिवराम |
| ७९ | हंडोरे मेघना सुनिल | ८० | भरत अभिमन्यु चव्हाण |
| ८१ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ८२ | राजे गिरीश अनंत |
| ८३ | पाटील मालती रमाकांत | ८४ | पाटील अवंतिका शशिकांत |
| ८५ | रेखा भालचंद्र पाटील | ८६ | यादव रिटा राजनाथ |
| ८७ | नाईक राजश्री सुनिल | ८८ | काकडे बालाजी दगडू |
| ८९ | ठाकूर अक्षय अनंत | ९० | कुरेशी यासीन अय्युब |

| | | | |
|---|---|---|---|
| ८१ | कळंबे मंगल चंद्रकांत | ९२ | विश्वनाथ भगत |
| ९३ | कुरेशी साजिया आई | ९४ | भगत सुधीर रामचंद्र |
| ९५ | असिया यासिन कुरेशी | ९६ | पाटील रेश्मा रमेश |
| ९७ | गोटे सिंधू कुंदन | ९८ | पठाण अशरफ उस्तान |
| ९९ | किणे राजन नारायण | १०० | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| १०१ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | १०२ | खान मिराज नईम |
| १०३ | आशरीन इब्राहीम राऊत | १०४ | हिरा सिताराम पाटील |
| १०५ | पाटील शैलेश मनोहर | १०६ | मुंडे सुनिता गणेश |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे:

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डुंबरे मनोहर जयसिंग | २. | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ३. | वाव्हळ सुभाष सिताराम | ४. | विलास चंदू कांबळे |
| ५. | पालांडे दशरथ बाबुराव | ६. | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| ७. | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर | ८. | मिलिंद माधव पाटणकर |
| ९. | एगडे रामचंद्र हरी | १०. | नंदिनी राजन विचारे |
| ११. | संगिता माणिक पाटील | १२. | जगताप अश्विनी अशोक |
| १३. | साळवी मनोहर रामा | १४. | अनिता अरुण बिर्जे |
| १५. | संजय संतू वाघुले | १६. | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| १७. | राजेश भालचंद्र गवारी | १८. | डोंगरे सिराज महम्मद अली |
| १९. | अन्सारी साजिया परवीन सरफराज | २०. | |

रजा सदस्य खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १. | मंदार प्रमोद विचारे |

अर्ध्या तासानंतर सभा पुर्ववत सुरु होते.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, कॉंग्रेस पक्षाकडून गटनेते पदाबाबत आपल्याकडे पत्र आले आहे तरी सदरचे पत्र सभागृहात वाचुन दाखविण्यांत यावे.

मा.सचिव :

सन्मा.सदस्य श्री.शैलेश पाटील यांचा आज वाढदिवस असुन त्यांच्या वाढदिवसानिमित्त मा.महापौर सो सभागृहाच्यावतीने अभिनंदन करतात.

मा.सचिव :

मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडुन ठाणे महानगरपपलिका भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे गटनेता म्हणून श्री.विक्रांत चव्हाण यांची निवड केल्याबाबतचे पत्र आले असुन ते मी सभागृहात वाचुन दाखवित आहे.

**पत्र वाचुन दाखवितात.**

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.विक्रांत चव्हाण यांना कॉंग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी निवड करणेबाबत कोकण विभागाकडुन पत्र आले आहे तरी श्री.विक्रांत चव्हाण कॉंग्रेस पक्षाचे गटनेते म्हणून निवड झाल्याचे मी याठिकाणी जाहिर करीत आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कु.स्वप्नाली लाड या मुलाचा अपघात झाला व त्यानंतर सन्मा.सदस्या श्रीमती उषा भोईर यांनी ती परिस्थिती चांगल्यारितीने हाताळली. महापौर महोदय मी आपल्याकडे एक पत्र दिले आहे तरी श्रीमती भोईर यांचा सभागृहाच्यावतीने सत्कार करण्यात यावा. व श्रीमती भोईर यांनी सदरची परिस्थिती कशी घडली याबाबत थोडक्यात सांगावे.

श्रीमती उषा भोईर :

महापौर महोदय, गेल्या आठवडयात शुक्रवारी ठाण्यामध्ये जी घटना घडली तशी घटना यापुर्वी आपल्या ठाण्यामध्ये कधीच घडली नव्हती. दिल्लीनंतर आपल्या ठाण्यामध्ये अशाप्रकारची घटना घडली आहे. मागिल शुक्रवारी रात्रौ साडेनऊच्या सुमारास मी ऑफीसमधुन घरी येत असताना रस्त्यावर कु.स्वप्नाली लाड नावाची मुलगी जवळजवळ कोमामध्ये गेली होती, रस्त्यावर ती पुर्णपणे रक्तबंबाळ अवस्थेत होती त्यावेळी मी तिला उचलुन माझ्या गाडीमधुन माझ्या वॉर्डातील बाळकुममधील ओझा या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले त्यावेळी तेथील डॉक्टरांनी मला सांगितले की ही केस अत्यंत क्रिटीकल असुन ताबडतोब या मुलीला आपण मोठया हॉस्पीटलमध्ये घेऊन जा. मी तात्काळ आपल्या बाळकुम येथील हॉस्पीटलमधुन ॲम्बुलन्स बोलावली व माझ्या मिस्टरांना तसेच माझे सासरे यांनासुध्दा बोलावुन घेतले आणि कु.स्वप्नाली हिला त्यावेळी तिचा श्वाससुध्दा बंद झाला होता,तिला पाच मिनिटात आम्ही ज्युपिटर या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले.

महापौर महोदय आज अशाप्रकारच्या ठाण्यामध्ये घटना होत असताना माझी आपणास अशी विनंती आहे की आपण जेथे जेथे आवश्यकता असेल त्याठिकाणी कॅमेरे लावण्यात यावे. ज्याठिकाणी रिक्षा स्टँड किंवा बसस्टँड असेल त्या त्याठिकाणी आपण कॅमेरे लावावेत. आज महिला व मुली जेव्हा घरातुन बाहेर पडत असतात त्यावेळी त्या छातीवर दगड ठेऊन बाहेर पडत असतात. आज प्रत्येक आईला असे वाटतअसते की आज आपली मुलगी घरातुन बाहेर पडली आहे ती लवकरात लवकर घरी कधी येईल अशी धास्ती वाटत असते. तरी आपण याबाबत गांभिर्याने लक्ष दयावे. तसेच ज्याठिकाणी हा अपघात झाला तेथे लाईट नाही तरी त्याठिकाणी पोल ताबडतोब लावण्यात यावे. व अशी घटना पुन्हा ठाण्यामध्ये होऊ नये अशाप्रकारची मी आशा बाळगते. आज कु.स्वप्नाली लाड हिची तब्येत सुधारत असुन ती चांगल्याप्रकारचे रिस्पॉन्स देत आहे. कु.स्वप्नाली ही सॉप्टवेअर इंजिनिअर असुन आईवडीलांची ती एकुलती एक मुलगी आहे, तिचे वडील इंडीयन ऑईलमध्ये काम करीत होते तिने त्यांना व्हीआरएस घ्यायला लावली. व ती स्वतः नोकरी करीत आहे. कु.स्वप्नाली ही वर्तकनगर येथे नोकरी करीत आहे. तरी माझी सर्व नगरसेवकांना विनंती आहे की आपण सकाळी उठल्यावर दोन मिनिटे स्वप्नाली चांगली होवो याकरीता प्रार्थना करा,जेणेकरुन आपल्या सर्वांसमोर ती यावी . तिच्या आईवडीलांची हिच इच्छा आहे की आमची सर्वस्व ही स्वप्नालीच आहे. कु.स्वप्नाली ही या सगळयातुन लवकरात लवकर कशी बाहेर पडेल याबाबतच मी विचार करत असते, तिला मी रोज हॉस्पीटलमध्ये भेटायला जाते,आता तिची तब्येत सुधारत आहे. आपल्या जिल्हयामध्ये अशी दुर्घटना घडली आहे जो कोणी नराधम आहे तो जर सापडला तर त्याला देवसुध्दा माफ करणार नाही, तरी पुन्हा अशाप्रकारच्या दुर्घटना आपल्या ठाण्यामध्ये घडु नये याकरीता सीसी कॅमेरे लावण्याबाबत माझी विनंती आहे. आज जर तेथे सीसी कॅमेरे असते तर हा प्रकार घडला नसता. कापुरबावडी सर्कलजवळतरी सीसी कॅमेरे असतातर त्या रिक्षातील ड्रायव्हर कोण आहे कळले असते, परंतू ते नसल्यामुळे तो नराधम कोण आहे हे समजले नाही. तुम्ही माझा सत्कार करणार आहात परंतू माझा खरा सत्कार असेल तो म्हणजे जेव्हा ती आपल्या सर्वांसमोर उभी राहिल तो माझा खरा सत्कार असेल. आज तिच्या आईवडीलांना रात्रंदिवस झोप लागत नाही, आज मला त्यांचाच विचार मनामध्ये येत असतो की तिचे आईवडील हे सर्व कसे सहन करीत असतील. तरी अशी दुर्घटना पुन्हा होऊ नये याबाबत आपण सर्वांनी प्रयत्न करावेत. तसेच ज्याज्याठिकाणी रिक्षा स्टँड असतील त्या त्याठिकाणी महिला पोलिस तैनात करावीत, तसेच महिला रिक्षा ड्रायव्हरची आपण परवानगी दयावी अशाप्रकारचे मी लेखी पत्रसुध्दा दिले आहे. तरी याबाबत आपण गांभिर्याने लक्ष दयावे. एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

श्री.अशोक वैती :

महापौर महोदय, याठिकाणी सन्मा.भोईर मॅडम यांनी सीसी टिव्ही कॅमेरेबाबत सूचना केली आहे . तरी प्रशासनाने हे नुसते ऐकुन न घेता याबाबत उत्तर देणे गरजेचे आहे. तसेच सीसी टिव्ही कॅमेरे हे आम्ही नगरसेवक निधीमधुन करु शकतो कां? हा देखिल मुद्दा आहे. व जर करु शकतो तर आमचा जो नगरसेवक निधी असेल किंवा प्रभाग सुधारणा निधी असेल, तरी आपण जे कामकाज करतो ते लोकांना सुविधा देण्याकरीता तसेच त्यांना सोयी-सुविधा देण्यासाठी करतो. तसेच ही दुर्घटना कां घडली याचेसुध्दा कारण शोधणे गरजेचे आहे. आम्ही स्थायी समितीमध्ये चर्चा केली होती त्यावेळी मा.आयुक्तसुध्दा तेथे होते त्यांनी याबाबत उत्तर दिले की दुर्घटना घडत असताना तेथील जो माहोल होता तो त्याठिकाणी लेडीज बार वगैरे होते, तेथे कारवाईसुध्दा चालु होते,आणि ती दुर्घटना घडण्यामागचे कारणच ते आहे. त्या रस्त्यावरुन आमची एखादी भगिनी जात असेल तर तेथील लोकांच्या नजरा या वाईट असतात कारण तेथे लेडीज बार आहे व व या तेथुनच येत आहेत अशाप्रकारची भावना होते. तरी हे लेडीज बारसुध्दा बंद होणे

आपणा सर्वांना विनंती आहे की, याबद्दल ठोस पाऊल उचलण्यासाठी सीसी टिव्हीचा जो मुद्दा आहे तो तुमच्याकडुन क्लिअर होऊदे,आणि प्रत्येक प्रभागामध्ये त्या त्या लोकप्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे ही जी कल्पना आहे ती पुरेशी ठरत असेल तरच ते लावण्यात यावेत. साहेबांनी उत्तर दिल्याप्रमाणे शोभेचे सीसी टिव्ही असतील तर मला वाटत नाही की हे प्रोजेक्ट सक्सेस होईल. मला विदयुत विभागाकडुन अशाप्रकारची उत्तरे देण्यांत आली आहेत तरी याबाबत आपण व्हेरिफाय करु शकता. तरी याबाबत ठोस अशा उत्तराची तुमच्याकडुन अपेक्षा करते, आणि पुन्हा एकदा भोईर ताईंचे अभिनंदन करुन आपणा सर्वांतर्फे स्वप्नाली लाडसाठी ईश्वरचरणी प्रार्थना करते. धन्यवाद.

श्री.रामभाऊ तायडे :

महापौर महोदय,मी याठिकाणी सन्मा.सदस्या उषाताई भोईर यांचे अभिनंदन करतो. पंधरा दिवसापुर्वी ठाण्यामध्ये ही दुर्घटना घडली आहे. ज्यावेळी अशाप्रकारची दुर्घटना होते त्यावेळी पोलिसांचा ससेमिरा लागतो, पोलिस त्रास देतात की तुम्ही कसेकांय यांना उचलले तुम्ही कसेकांय यांना ॲडमिट केले, या सगळयाची पर्वा न करता भोईर मॅडम यांनी जे धाडस दाखवले व त्या मुलीला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले व आज त्या मुलीच्या तब्येतीमध्ये सुधारणा होत आहे.त्याबद्दल त्यांना सॅल्युट केले पाहिजे. आज ठाणे शहरामध्ये ही जी घटना घडली यामध्ये थोडयाप्रमाणात महापालिकेचीसुध्दा चुक आहे. आज त्याठिकाणी जर सीसीटिव्ही असते तर जे नराधम आहेत त्यांचे फुटेज आपल्याला दिसले असते आणि ते पकडले गेले असते, परंतू तसे झाले नाही . तरी एक विश्वस्त या नात्याने मला असे वाटते की स्वप्नाली लाड यांचा संपूर्ण खर्च महापालिकेने उचलावा, तसेच संपूर्ण सभागृहाने एक महिन्याचे वेतन कु.स्वप्नाली लाड हिला देण्यात यावे. जर असे होत नसेल तर माझे एकटयाचे एक महिन्याचे वेतन मी त्या मुलीला देत आहे. जयभीम जयभारत.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय याबाबत प्रशासनाकडुन उत्तर मिळाल्यास योग्य होईल.याबाबत एवढेच उत्तर देण्यात यावे की नगरसेवक निधीतुन आपल्याला सीसीटिव्ही कॅमेरे बसविता येतील किंवा नाही?

मा.मुख्य लेखा वि वित्त अधिकारी :

महापौर महोदय, शासनाच्या जीआरमध्ये असे नमुदआहे की,नगरसेवक निधीमधुन कोणती कामे करता येतील व कोणती करता येणार नाही त्याप्रमाणे यामध्ये असे नमुद आहे नगरसेवक निधीमधुन सीसी टिव्ही कॅमेरे बसविता येणार नाही.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय,नगरसेवक निधी,प्रभाग विकास निधी, मागासवर्गीय निधी किंवा खास बाब म्हणून. तरी यातुन कोणत्या निधीतुन सीसी टिव्ही कॅमेरे बसविता येतील एवढेच फक्त सांगा.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, या जीआरमध्ये नगरसेवक निधी किंवा प्रभाग विकास निधीमधून बेंच बसविणेबाबत उल्लेख आहे कां?

मा.मुख्य लेखा वि वित्त अधिकारी :

यामध्ये ७० ते ८० आयटम्स आहेत व ती कामे करता येतील. आणि १० ते १५ आयटम्स आहेत ती करता येत नाहीत.

श्री.नजिब मुल्ला :

तरीसुध्दा आपण ती बसवत असतो. व यामध्ये नागरीकांची गरज पाहतो तसेच प्रभाग सुधारणेकरीता बसवु शकतो. त्याचप्रमाणे आपण सीसी टिव्ही कॅमेरेसुध्दा बसवु शकतो. तरी त्याचा उल्लेख असणे गरजेचे नाही. याबाबत ठराव करुन आपण बसवु शकतो. तरी याबाबत पॉझिटिव्हली ॲप्रोच ठेऊन प्रत्येक नगरसेवक आपापल्या प्रभागात कॅमेरे बसवु शकतो.

मा.मुख्य लेखा वि वित्त अधिकारी :

यामध्ये पर्टीक्युलर नगरसेवक निधीबाबत आहे. बाकीच्या निधीबाबत नाही.नगरसेवक निधीबाबतचा जीआर आहे,प्रभाग विकास सुधारणाबाबतचा जीआर नाही.

श्री.मुकुंद केणी :

महापौर महोदय, महापौर निधीतुन ही कामे करण्यात यावीत.

मा.महापौर :

सन्मा.सदस्यांच्या माहितीकरीता मी सांगत आहे आहे की, मागच्या बजेट युएसएची टेक्नॉलिजी आणणेबाबत ॲरोस्टॅक द बेस्ट सिविलिएन्स सर्व्हीस अशाप्रकारची मागणी केली होती व याबाबत आपण ठराव करुन शासनाला कळविले आहे की, याबाबत बजेटमध्ये १० ते २५ कोटीची तरतुदसुध्दा करण्यांत आली आहे. शहराच्या दृष्टीकोनातुन आपण ही जबाबदार घेतली होती परंतू ठाणे शहरामध्ये एअरफोर्स आणि मिलिटरी असल्यामुळे तेथे ब्लॅकआऊट कसे करता येईल याबाबत शासनाकडुन उत्तर येणे बाकी आहे व त्यामुळे हे प्रकरण पेंडींग आहे. शहरातील प्रत्येक नागरीकाच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन आपण हे प्रयत्न केले आहेत तरी याबाबत त्यांचेकडून जोपर्यंत ऑर्डर येत नाही तोपर्यंत आपण आपल्या निधीतुन करु शकतो किंवा कसे याबाबत मा.आयुक्तांकडे पडताळणी करावयाची आहे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, कु.स्वप्नाली लाडची घटना झालेली आहे. तरी त्याबाबत सन्मा.सदस्या उषा भोईर यांनी साहस दाखवुन या मुलीचे प्राण वाचविले आहेत, तरी याबाबत सभागृहाची मागणी आहे की, प्रत्येक प्रभागात सीसी टिव्ही कॅमरे लावावेत जेणेकरुन अशाप्रकारची घटना टाळता येतील. याबाबत मा.विरोधी पक्षनेते यांनी याठिकाणी प्रशासनाला प्रश्न विचारला की,नगरसेवक निधी किंवा प्रभाग विकास निधीमध्युन कॅमरे बसविता येतील कां,त्यावर प्रशासनाकडून नकारात्मक उत्तर देण्यात आले आहे. महापौर महोदय मला याठिकाणी असे सांगायचे आहे की, आज ठाण्यातील अनेक नागरीक ठाण्याच्या बाहेर किंवा परदेशात जात असतात त्यावेळी या सी सी टिव्ही कॅमेरेचे किती फायदे होत असतात त्याचे कौतुक आपल्याला पहायला मिळते. याठि काणी प्रशासनाचा नाकर्तेपणा आणि नियमावर बोट ठेवणे याबाबत मला चर्चा करायची नाही,परंतू कांही सोल्युशन्स आहेत ते मला याठिकाणी मांडायचे आहेत. मी प्रशासनाला सीसी टिव्ही कॅमेरेबाबत निवारण करण्याच्यादृष्टीकोनातुन एक प्रोजेक्ट दिले होते, ज्याठि काणी एलएडीचे पोल आहेत,त्याअगोदर हे प्रोजेक्ट मा.आयुक्त तसेच श्री.पोटे यांना सबमिट केले होते.

एलएडीचे पोल व कॅमेरा असे जॉईंट ती कंपनी आपल्याला दयायला तयार आहे. आणि याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारे पैसे दयायचे नाहीत, तरी ते पोल जर आपण मंजूर केले तर त्या पोलमुळे वाचणारे जे बिल आहे ते जवळजवळ ७० टक्के बिल वाचु शकते. व जे ७० टक्के बिल वाचत आहे त्यामध्ये ती कंपनी ३५ टक्के महापालिकेस देण्यास तयार आहेत अणि उर्वरित ३५ टक्के ते स्वतः घेऊन हा प्रोजेक्ट राबवण्यात येणार आहे व अशाप्रकारचा प्रस्ताव मी प्रशासनाला सादर केला आहे. याबाबत मा.पोटे साहेबांना सभागृहात बोलावून विचारु शकता. आता यानंतर नविन एलएडीचे पोल आले आहेत, आणि हे प्रोजेक्ट कां मंजूर झाले नाही, व यामुळे आज सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी या प्रोजेक्टमध्ये कांही कमतरता असल्यास येथे चर्चा करण्यात यावी ,परंतू तो प्रोजेक्ट जर चांगला आहे तर ते का मंजूर होत नाही ,यास विलंब का होत नाही. आज सगळया वॉर्डामध्ये नागरीकांची मागणी वाढली जात आहे.आपल्यासुध्दा ऑफीसजवळ कॅमेरे आहेत,माझ्यासुध्दा ऑफीसजवळ कॅमेरे आहेत. आता पोलिससुध्दा मागणी करतात की चोरी झाली आहे तर तुमच्याकडून सीडी काढुन दया. जर या प्रोजेक्टला मान्यता दिली तर प्रत्येक पोलला सीसी टिव्ही येतील. तरी या प्रपोजलबाबत याठिकाणी पोटे साहेबांनी माहिती दयावी व याबाबत निर्णय व्हावा.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

महापौर महोदय,या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेबांशी चर्चा करण्यात आली होती. आपल्या शहतील पोलचे जीएॅस ३०.२१ मॅपिंग करीत आहोत.य कारण आपल्याला स्पर्धात्मक दर प्राप्त करावे लागतील.एका एजन्सीने प्रस्ताव दिला व आपण त्यांना डायरैक्ट काम दिले तर त्यामध्ये अनियमितता होईल .आपण जीएॅस मॅपिंग करीत आहोत व त्यातील दहा हजार पोलचे मॅपिंगसुध्दा झाले आहे.काम प्रगतीपथावर आहे. व हे काम आपण शास्त्रोक्त पध्दतीने करीत आहोत ज्याला आपण बेसलाईन स्टडी म्हणतो. आपण आत्ताच बोलल्याप्रमाणे नक्की विजेची किती प्रमाणात बचत होते याबाबत प्रथम आपल्याला स्टडी करावे लागेल.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, याठिकाणी विजेची किती बचत होत आहे याबाबत मॅपिंग चालू आहे. आणि त्याचवेळी आपण पैसे देऊन एलएडी लावत आहोत, तरी याबाबत शंका निर्माण होत आहे. आणि या गोष्टीला जवळजवळ सव्वा वर्ष झाले आहे.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

महापौर महोदय आपण आता जे पोल लावत आहोत ते वेगवेगळया निधीमधून लावत आहोत त्यामध्ये पिक्चर्स नाहीत, तो जो प्रस्ताव आहे तो फक्त फिटींग बदलण्याबाबतचा आहे, पोल बदलण्याबाबत नाही. त्याचप्रमाणे ....,

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,याठिकाणी सोडीयम व्हेपर्स दिवे यांना जे १०० टक्के बिल येते. आणि मी मगाशी सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये फक्त ३० टक्के बिल येणार आहे. आणि ५० टक्क्यामध्ये ती एजन्सी मेंटेंनंस वगैरे करणार आहे. तरी यामध्ये महापालिकेचे पैसेसुध्दा वाचणार आहेत.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

महापौर महोदय याबाबत सर्व्हे झालेला आहे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय,सन्मा.शिंदे साहेबांनी जी सूचना केली आहे की, त्यावर आपण अनियमितता आहे अशाप्रकारचे आपण याठिकाणी वक्तव्य केले आहे.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

याठिकाणी सन्मा.सदस्यांनी जो प्रस्ताव दिला आहे त्यानुषंगाने आपल्याला एक प्रस्ताव करुन त्याबाबत कांही निविदा मागवाव्या लागतील की अशाप्रकारे कोणी देण्यास तयार आहे कां? तरी याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, याबाबत मागच्या सभेमध्ये ठरावसुध्दा झाला होता.

श्री.नजिब मुल्ला :

आत्ताच श्री.पोटे यांनी सांगितले की धोरणात्मक निर्णय झाला नव्हता म्हणून तुम्ही याची अंमलबजावणी केली नाही. जर या एजन्सीमुळे आपल्या महापालिकेचे पैसे वाचत आहेत, तसेच कॅमेरे लावुन ठाणे शहर अत्याधुनिक बनविण्यासाठी ते उपयुक्त आहेत.याबाबत पोलीसांनीसुध्दा सी सी टिव्ही कॅमेरे बसविणेबाबत महापालिकेशी पत्रव्यवहार केला होता. तरी अशाप्रकारची सूचना मांडल्यावर आपण कांय कांय हालचाली केल्या ते सांगण्यत यावे.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

महापौर महोदय, यासंदर्भात मा.आयुक्त साहेबांच्या दालनात चार ते पाच महिन्यापुर्वी बैठक झाली होती. तरी आता आपण मॅपिंग करुन फायनल स्टेजला आलो आहोत. तसेच मॅपिंग म्हणजे आपण प्रत्येक पोलची बेसलाईन स्टडी करतो ,आपल्याला हे बचतीच्या माध्यमातुन करावयाचे आहे, तरी यामध्ये नक्की किती बचत होणार आहे याबाबतची बेसलाईन स्टडी होत आहे.

श्री.नजिब मुल्ला :

पोटे साहेब तुम्ही आम्हाला कांही फिरवाफिरवी करु नका,तुमचा कोठेतरी फ्युज उडेल व तुम्ही अडचणीमध्ये येऊ शकता.आपण विदयुत विभागाचे उपनगर अभियंता आहात. सोडीयम व्हेपरच्या एका दिव्याला आपल्याला किती खर्च येतो,लाईट बिल किती येते व एलएडीचे एक सँपलिंग लावल्यानंतर त्याची किती बचत होते हा हिशोबाचा विषय आहे. व मॅपिंगचा अभ्यास करण्यासाठी सात महिने लागतात?

श्री.मनोज शिंदे :

आता तुम्ही जे एलएडी लावले आहेत त्याचे मॅपिंग सांगा.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

यामध्ये साधारण ६० ते ७० टक्के आपल्याला बचत मिळते.

श्री.मनोज शिंदे :

मग ते जे एलएडी देणार आहेत त्याचे मॅपिंग आपल्याकडे नाही कां?

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

बचत होणार नाही असे मी म्हणतच नाही. बचत होणार आहे हे नक्की परंतू..,

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,सात महिन्यापुर्वी जेव्हा आयुक्तांच्या दालनात निर्णय घेण्यात आला. आयुक्त साहेबांनी याला होकार दिला होता,पॉझिटिव्ह ॲप्रोच होता की तेथेच विषय थांबविण्यात आला हेता ?

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

आयुक्त साहेबांनी स्पर्धात्मक दर येण्यासाठी निविदा मागवाव्या लागतील असे सांगितले होते. व आता आपण फायनल स्टेजला असुन सादरीकरण झाले आहे.

श्री.नजिब मुल्ला :

निविदा काढण्यात आली आहे का? सात महिने तुम्हाला निविदा काढण्याकरीता लागतात?

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

आजच आयुक्त साहेबांशी बोलुन याबाबत अंतिम निर्णय घेऊ.

श्री.नजिब मुल्ला :

आम्ही येथे आपल्याला जागे करण्यासाठी बसलो आहोत कां? आम्ही वॉचमन आहोत का? तसेच तुम्ही कां केले नाही याबाबत याठिकाणी बोला.

श्री.मनोज शिंदे :

महपौर महोदय ही जगातील एकच कंपनी अशी होती की, जी अशाप्रकारे प्रोव्हाईड करत असेल. दुसरी कंपनी अशा सुविधा देणार नाहीत. मी वर्षभर कां थांबलो होतो की खरोखरच सीसी टिव्ही कॅमे-याची गरज हळुहळु वाढली आहे,आणि आता हे प्रकार घडायला लागले आहेत. तरी याबाबत तुम्ही सिरीयसली कांय करणार आहात ते सांगावे. महापौर महोदय याठिकाणी निर्णय व्हावा.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय आपण अशाप्रकारच्या निविदा काढणेबाबत आदेश दयावे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय आत्ताच सन्मा.सदस्य श्री.संजय घाडीगांवकर यांनी सांगितले की सेक्शन २१ मध्ये स्पष्टपणे तरतुद आहे. त्याचप्रमाणे तुम्ही अदयाप याबाबत एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट अदयाप मागविला नाही. तरी निदान हे जरी मागविले असते व याबाबत किती कंपन्या आहेत त्यांनी सादर करावे , असे केले असते तर आजपर्यंत हे काम नक्कीच झाले असते. सात महिने तुम्ही टेंडरींगकरीता घेता,म्हणजे आचारसंहिता लागण्यापुर्वी तुम्ही ही कामे डिक्लेअर केली असती. आता तुम्ही जाहिरात देणार म्हणजे दोन महिने शांत बसायचे. म्हणजे ही हेतुपुरस्सर केले जात आहे असे मला वाटते. इतके दिवस आम्हाला असे वाटत होते तुम्ही सभागृहाचे ऐकत नाही

परंतू आज हे सुध्दा सिध्द झाले की तुम्ही आयुक्तांचेसुध्दा ऐकत नाहीत. आज माझ्याकडे सात पोल आहेत व तुमचे मेंटेनंस जे लोक आहेत त्यांनी सांगितले की,आमच्याकडे एलएडी बल्ब नाहीत सोडीयम व्हेपरचे बल्ब स्टॉकमध्ये पडले आहेत. आज सर्व पोल बंद पडले आहेत.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

एलएडीची पाच वर्षाची गॅरेंटी आहे. व मी स्वतः आज बघुन घेतो.

श्री.सुधीर भगत :

महापौर महोदय, मी पोटे साहेबांना एक प्रश्न विचारतो की ठाणे महापालिकेमध्ये आपण सर्व्हीसेस व मेंटेनंसकरीता जो ठेका काढला आहे तो कोणत्या पध्दतीचा आहे? तुम्ही फक्त कर्मचारी नेमले आहेत परंतु तुमच्याकडे त्यांना देण्यासाठी कोणतेच साधन नाही. आपण एखादया गृहीणीला जर सांगितले की तुला जेवण बनवुन दयायचे आहे परंतू जेवणाकरीता काही सामान दिले नाही तर ती तुम्हाला कसे जेवण बनवुन देईल. ती तुमच्याकडे फक्त ताट आणि वाट आणुन देईल. तरी अशाप्रकारची आज प्रत्येक प्रभागाची अवस्था आहे. तुमच्या कर्मचा-यांना जर सांगितले की माझ्या वॉर्डातील अमुक इतके पोल बंद आहेत तर त्यांचे उत्तर असते की आमच्याकडे सामान नाही,अशी परिस्थिती आहे. तरी जर तुम्हाला ठेका दयायचा असेल तर सरसकट दया.जेणेकरुन त्याला आपण जबाबदार धरु शकतो. तुम्ही हा डबल गेम खेळत आहात हे चुकीचे आहे. तुम्ही मेंटेनंसचा फक्त ठेका काढता परंतू मेंटेनंसकरीता त्यांच्याकडे साहित्य नसेल तर ते मेंटेनंस कांय करणार?

श्री.मनोज शिंदे :

महापौर मला माझ्या विषयाची लक्षवेधी करावयाची नाही. माझ्या विषयावर मला निर्णय हवा आहे. मी जो मुद्दा मांडला आहे तो फार महत्वाचा मुद्दा आहे. सीसी टिव्ही कॅमेराबाबत प्रशासन दिरंगाई करीत आहे. तरी प्रशासनाने उत्तर दयावे की याबाबत आपण टेंडर काढणार आहे, तरी याबाबत प्रशासन कांय करणार आहे याबाबत याठिकाणी उत्तर देण्यात यावे.

मा.उपनगर अभियंता : विदयुत विभाग

महापौर महोदय याबाबत आजच मा.आयुक्त साहेबांशी बोलून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मनोज शिंदे :

याठिकाणी जर अशा प्रकारची उत्तरे देण्यात येत असतील तर मी स्वतः आयुक्तसाहेबांशी बोलतो.

श्री.नजिब मुल्ला :

याबाबत जो अभ्यास करण्यात आला आहे त्याबाबतचा रिपोर्ट आयुक्त साहेबांकडे सादर करण्यात येणार आहे तरी मॅपिंगमध्ये काय सिध्द झाले याबाबतची माहिती सभागृहापुढे देण्यात यावी. याबाबत जो अभ्यास करण्यात आला आहे तो काय केला आहे हे सांगण्यात यावे.

श्री.भरत चव्हाण :

महापौर महोदय, माझ्या वॉर्डात ब-याच ठिकाणी साखळीचोर असुन या दोन महिन्यात ब-याच महिलांचे चेन चोरण्याचे प्रकार झाले आहेत. महापौर महोदय सी सी टिव्ही कॅमेरे लावणे ही आज अत्यावश्यक सेवा झाली आहे व यामुळे निदान थोडया प्रमाणात तरी गुन्हे कमी होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे आम्ही आमच्या स्तरावरसुध्दा पोलिस स्टेशनला सीसी कॅमेरेबाबत मदत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आत्ताच सन्मा.सदस्य श्री. मनोज शिंदे यांनी सांगितले की सीसी टिव्ही कॅमेराबाबत मागच्या महासभेत प्रस्ताव करण्यात आला आहे तो सदरचे काम मागासवर्गीय निधीमधून करण्यात यावे अशाप्रकारची मी सभागृहाला विनंती करीत आहे.याठकाणी सन्मा.उषा भोईर ताई यांचे कौतुक केले पाहिजे.

श्री.मनोज शिंदे **:**

महापौर महोदय, माझा हाच मुद्दा आहे की सीसीटिव्ही कॅमेरे,एलएडी लाईट पुरविणेबाबत ज्या कंपनीचा विषय मी काढला आहे त्याबाबत प्रशासन काय उत्तर देणार आहे?जेणेकरुन सभागृहातील सदस्यांना याबाबतची माहिती उपलब्ध होईल.

श्री.हिरा पाटील :

महापौर महोदयस कु.स्वप्नाली लाड या मुलीवर जो प्रसंग आला व त्यावेळी सन्मा.भोईर ताई यांनी तिला तातडीने जी मदत केली याबाबत मी सन्मा.सदस्या भोईर यांचे अभिनंदन करते. व याचअनुषंगाने सभागृहातील सर्व सदस्यांची एकच मागणी आहे की सीसीटिव्ही कॅमरे लावण्यात आले पाहिजेत. आत्ताच सन्मा.मनोज शिंदे यांनी सभागृहात सांगितले की, मी श्री.पोटे यांना ग्रामिण भागातील दिव्यासंदर्भात मध्यंतरी सांगितले होते की आपण ठ ाणे शहरात एलएडी पोल लावणार आहात तर अशावेळी जे जुने पोल आहेत ते जुने पोलतरी निदान आमच्या ग्रामिण भागात लावण्यात यावे व यासाठीसुध्दा आठ ते नऊ महिने गेले आहेत. जुने पोल लावण्याबाबतसुध्दा टेंडर काढण्यात येतील अशाप्रकारची उत्तरे देण्यात येतात. माझ्या प्रभागामध्ये दोन दिवसापुर्वी गोकुळाष्टमीचा दिवस होता त्यावेळी श्री.मारुती म्हात्रे यांच्या घरातुन पाच वर्षाच्या मुलीला चोराने पळविले होते. परंतू ग्रामस्थांच्या मदतीने त्या चोराला पकडण्यात आले व त्या मुलीची सुटका करण्यात आली व ही बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. आजच आपण पोलसंदर्भात ज्याच्याकडे ठेका देतात त्याच्याकडे त्याबाबतचे पुरेसे साधनसामुग्री नसते. वर्ष-वर्ष रस्त्यावरील दिवे बंद असतात मग असे असताना मेंटेनंसचा खर्च कसा होतो?अशावेळी तुम्ही कोणत्या दिव्यांचा मेंटेनंस करीत आहात. आपण अशाप्रकारची फसवणुक कां करीत आहात? तरी माझी अशी मागणी आहे की प्रथम ग्रामिण भागामध्ये दिव्यांची सोय करण्यात यावी ही नम्र विनंती.

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, आज सभागृहात सीसी टिव्ही कॅमेराचा विषय चालु आहे त्यानुषंगाने मी सांगत आहे की मध्यंतरी मा.आमदार एकनाथजी शिंदे, मा.आमदार श्री.राजन विचारे, मा.प्रताप सरनाईक यांनी शहरात सीसी टिव्ही कॅमेरे लावण्यास सुरुवात केली होती. परंतू त्यावेळी मा.गृहमंत्री यांनी पत्र दिले आहे की,अशाप्रकारचे आमदार निधीतुन सीसी टिव्ही कॅमेरे बसवू शकत नाही . आणि जर ठाणे महापालिकेने अशाप्रकरचे कॅमेरे लावले तर त्यास परवानगी मिळणार आहे का? व हे मी जबाबदारीने बोलत असुन याबाबतची चौकशी करण्यात यावी.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय अशाप्रकारची कांही पत्र आले असल्यास याठिकाणी चर्चा थांबवुन याबाबतचे पत्र सभागृहात वाचुन दाखविण्यात यावे.

मा.सभागृह नेते :

आम्ही याठिकाणी जे बोलत आहे ते चुकीचे बोलत नाही.

श्री.नजिब मुल्ला :

एका शासकीय खात्यावर असे आरोप करणे योग्य नाही. एका बाजुला आपण म्हणत आहोत की नगरसेवक निधीतुन कॅमेरे बसवावे व दुस-या बाजुन अ ापण असे बोलता म्हणजेच कामाला कुठेतरी खिळ घालण्याचा प्रयत्न होत आहे.

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय याला आमचा विरोध नाही, परंतू पुणे शासनाने अशाप्रकारचे महिन्यापुरते बंधन घातले आहे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, आपल्याला याठिकाणी कोणत्याप्रकारचे राजकारण करावयाचे नाही. तरी याठिकाणी सभागृह नेते यांना विनंती करेन. कारण आज ठाणे शहरामध्ये अशाप्रकारच्या घटना वाढत आहे व त्यामुळे सभागृहातील सदस्यांनी याठिकाणी सीसी टिव्ही कॅमरे बसविणेबाबत मागणी केली आहे. परंतू प्रशासनाकडून उत्तर देण्यात आले की, ही कामे नगरसेवक निधी तसेच प्रभाग विकास निधीतुन करता येणार नाहीत. व त्यामी मी सभागृहात एक सूचना मांडली की ठाणे शहरात सीसी टिव्ही कॅमेरे बसवुन देणेबाबत एक कंपनी इच्छुक आहे व त्यांनी एलएडी व कॅमेरे देणेचे मान्य केले आहे. व त्याबाबत याठिकाणी निर्णय घ्यावयाचा आहे. यावर याठिकाणी चर्चा चालु आहे.

मा.महापौर :

मी सन्मा.सदस्या श्रीमती उषा भोईर यांचे अभिनंदन करतो. कु.स्वप्नाली लाड हिच्यावर जो गंभीर प्रसंग उद्‌भवला होता त्यावेळी भोईर यांनी धाडस दाखवुन कु.स्वप्नाली हिला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले त्याबद्दल मी पुन्हा संपूर्ण ठाणेकरांच्यावतीने त्यांचे अभिनंदन करीत आहे.

त्याचप्रमाणे सन्मा.शिंदे यांनी जो प्रस्ताव सभागृहात आणला होता व त्याबाबतचा ठरावसुध्दा आपण केला होता त्यास आज जवळजवळ एक वर्ष झाले. आज प्रशासन आणि महापालिकेचे एक ट्रस्टी व नगरसेवक म्हणून आपलीसुध्दा नैतिक जबाबदारी आहे महपालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल याबाबत जर कांही सदस्यांनी सभागृहात सूचना केल्या असतील, तरी या प्रस्तावाबाबत आपण ठराव केला होता तरी त्याची प्रशासनाने आजच मा.आयुक्त साो यांचेशी चर्चा करुन दोन दिवसांत याबाबत टेंडर काढुन ताबडतोब अंमलबजावणी करावी अशाप्रकारचे आदेश देण्यांत येत आहे.

मा.विरोधी पक्ष नेते :

महापौर महोदय,सन्मा.शिंदे साहेबांच्या सूचनेवर आपण रुलिंग दिले आहे. व त्याप्रमाणे प्रशासन यासंदर्भात निविदा काढतील. त्याचप्रमाणे सन्मा.सदस्या श्रीमती उषा भोईर यांनी कु.स्वप्नाली लाड हिच्याबाबतीत जे प्रसंगावधान दाखवुन कु.लाड हिला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले व त्यांनी जे धाडस दाखविले ते निश्चित अतिशय उल्लेखनीय असेच आहे. तरी माझ ी अशी सूचना आहे की ठाणे महापालिकेच्या वर्धापन दिनी श्रीमती भोईर यांना "ठाणे भूषण" किंवा "ठाणे गौरव" पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा. त्याचप्रमाणे मी प्रशासनास अशी विनंती

करतो की, याबाबत राज्य शासनाचा राज्य शासन हा जो पुरस्कार असतो त्यावेळी आपण सुध्दा आपल्या महापालिकेकडून सन्मा.भोईर ताई यांच्या नावाची शिफारस करावी.

त्याचप्रमाणे एलएडीबाबत सन्मा.सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे प्रभागविकास निधी किंवा नगरसेवक निधीबाबत याठिकाणी चर्चा केली परंतू एका सीसी टिव्ही कॅमे-याची एस्टीमेट तसेच त्या प्रभागात त्याची किती आवश्यकता आहे व ते जर प्रभाग विकास निधीपेक्षा जास्त होत असेल तर ते योग्य होणार नाही. तरी मी याबाबत याठिकाणी असे सांगू इच्छितो की, ही कामे प्रभाग विकास निधीतुन करण्याबाबत सभागृहात ठराव मंजूर करावा व त्याहीपेक्षा आत्ताच सन्मा.मनोज शिंदे यांनी जी सूचना केली आहे त्याप्रमाणे आपल्याला जर एस्टीमेटची अडचण आहे व आपण त्याबाबत जे रुलिंग दिले आहे ते ताबडतोब प्रशासनाने अंमलात आणावे. तरी याबाबत दोन दिवसात कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे मी या सभागृहाच्यावतीने तसेच संपूर्ण ठाणे शहराच्या वतीने सन्मा.उषा भोईर यांचे अभिनंदन करतो .त्याचप्रमाणे त्यांचा आपल्या वर्धापन दिनी तसेच राज्य शासनाचा पुरस्कार देणेबाबत शिफारस करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, सन्मा.सदस्या उषा भोईर यांचा ठाणे महापालिकेच्या वर्धापन दिनी पुरस्कार देऊन गौरव करावा त्याचप्रमाणे यांना "ठाणे भूषण" किंवा "ठाणे गौरव" पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा. त्याचप्रमाणे राज्य शासनाकडूनसुध्दा त्यांचा गौरव करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांच्यामागे ठामपणे उभे राहणारे आमचे सन्मा.सदस्य श्री.संजय भोईर यांचेसुध्दा आम्ही याठिकाणी अभिनंदन करतो .

त्याचप्रमाणे सन्मा.मनोज शिंदे यांनी जो याठिकाणी विषय मांडला त्याचीसुध्दा ताबडतोब पुर्तता करण्यात यावी. महापौर महोदय, सन २०१३-१४ करीता समाजकल्याण विभागातर्फे महिला बालकल्याण समितीच्या ज्या कांही योजना आहेत त्यासंदर्भात स्थायी समितीमध्ये आम्हाला प्रशासनाकडून असे उत्तर देण्यात आले होते की, गेल्या मंगळवारपर्यंत हा विषय पुर्णपणे संपविण्यात येईल,परंतू अदयाप सहा.आयुक्त यांनी हा विषय संपविलेला नाही. आता पुन्हा पाच-सहा दिवसांनी आचारसंहिता लागणार आहे. तरी याबाबत प्रशासन कांय करणार आहे हे विषय घेणार आहात किंवा नाही?

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, मा.सभागृह नेते यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. तरी आज सहा.आयुक्त हजर आहेत किंवा नाही हे पहावे.

मा.विरोधी पक्षनेते :

महापौर महोदय, आपल्याकडे नविन उपआयुक्त याची नियुक्ती करण्यात आली आहे व आज ते सभागृहात उपस्थित आहेत तरी त्यांची सभागृहात ओळख करणे आवश्यक आहे. तरी अदयाप ती करण्यात आलेली नाही.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, आज महासभेमध्ये किती सहा.आयुक्त तसेच किती उपआयुक्त हजर आहेत याबाबतची माहिती सभागृहाला देण्यात यावी. या सर्व अधिका-यांची सभागृहाला उपस्थिती देण्यात यावी व त्यानंतरच बाकीच्या विषयावर सभागृहात चर्चा करण्यात यावी.

मा.उपआयुक्त श्री.संजय हेरवाडे :

महापौर महोदय,तसेच मा.सभागृह. सभागृहाला माझी ओळख करुन देत आहे. माझे नांव श्री.संजय हेरवाडे आहे व मी ठाणे महानगरपालिकेत उपआयुक्त म्हणून चार्ज घेतला असुन यापुर्वी मी कोल्हापुर महानगरपालिकेत उपआयुक्त- मुख्यालय म्हणून पावणेचार वर्ष कामकाज केले आहे.

मा.सहा आयुक्त श्री.मारुती गायकवाडः

महापौर महोदय मी श्री.मारुती गायकवाड. याठिकणी मी सहा.आयुक्त या पदावर रुजु झालो असुन माझ्याकडे अदयाप चार्ज देण्यात आलेला नाही. यापुर्वी मी मुख्याधिकारी -नगर परिषद जिल्हा पुणे याठिकाणी साडेतीन वर्षे काम केलेले आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय या महासभेला किती अधिकारी उपस्थित व अनुपस्थित अधिका-याची माहिती मागितली आहे ती देण्यात यावी किंवा जेवणाकरीता सुट्टी करुन नंतर सर्व अधिका-यांना सभागृहात बोलाविण्यांत यावे.

मा.सहा आयुक्त श्री.मारुती गायकवाडः

महापौर महोदय मी श्री.मारुती गायकवाड. याठिकणी मी सहा.आयुक्त या पदावर रुजु झालो असुन माझ्याकडे अदयाप चार्ज देण्यात आलेला नाही. यापुर्वी मी मुख्याधिकारी -नगर परिषद जिल्हा पुणे याठिकाणी साडेतीन वर्षे काम केलेले आहे. मी येत्या गुरुवारपासुन येथे रुजु झालो आहे.

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, नविन सहा.आयुक्त या गुरुवारपासुन आपल्याकडे हजर झाले आहेत असे असताना त्यांना अदयाप चार्ज कां देण्यात आलेला नाही?

मा.विरोधी पक्षनेते :

मा.सभागृह नेते आपण चार्जबाबत गोष्ट करु नका, नाहीतर त्यांना तसेच ठेवतील. आपल्याला वाईट अनुभव आहे. आपण एखादयाची शिफारस केली तर त्याला घरी बसावे लागते.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, दादोजी कोंडदेव स्टेडियम याठिकाणी कांही मुलाखती चालु आहेत कां?

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, नविन आलेल्या सहा.आयुक्तांना चार्ज देणेबाबत अभ्यास करण्याची गरज आहे कां? जे आवडते अधिकारी आहेत त्यांच्याकडे चार-चार चार्ज देण्यात आले आहेत. आता लवकरच आचारसंहिता लागणार आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, दादोजी कोंडदेव स्टेडियम याठिकाणी कांही मुलाखती चालु आहेत कां? महापौर महोदय, मला याठिकाणी उपस्थित उपआयुक्त तसेच सहा.आयुक्त यांची यादी देण्यात यावी. तसेच जे उपस्थित नाहीत ते कुठे आहेत?

मा.महापौर :

उपस्थित किती आहेत याबाबतची माहिती देण्यात यावी.

मा.सभागृह नेते :

याठिकाणी समाजकल्याण विभागाचे कांय झाले आहेत याबाबत संबंधित अधिकारी यांनी उत्तर दयावे. कारण लवकरच आचारसंहिता लागणार आहे. मग त्यावेळी चेकबाबत काय करणार?

श्रीमती संध्या मोरे :

आज सभागृहात चेक देण्याबाबत चर्चा चालु आहे. परंतू वागळे प्रभागामध्ये अजुन याबाबतची छाननीच चालु आहे.

मा.अतिरिक्त आयुक्त:

महापौर महोदय, मी आता माहिती घेतली त्यानुसार श्री.बुरपुल्ले तसेच श्री.मंगल शिंदे हे दोन सहा.आयुक्त तसेच नव्याने आलेले सहा.आयुक्त श्री.गायकवाड हे आज याठिकाणी उपस्थित आहेत. उपआयुक्त श्री.ढोले येथे उपस्थित आहेत. तसेच श्री.हेरवाडे,श्री.रणखांब इत्यादी उपस्थित आहेत.

श्री.संजय भोईर :

आयुक्त साहेब, ज्यांच्याकडे प्रभाग समितीचा कार्यभार आहे ते सहा.आयुक्त व उपआयुक्त कोठे आहेत?

मा.अतिरिक्त आयुक्त:

बाकी जे सहा.आयुक्त व उपआयुक्त उपस्थित नाहीत,आणि जे रजेवर नसतील त्यांचेकडुन खुलासा मागविण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

श्री.संजय भोईर :

आयुक्त याहेब आम्ही कारवाईबाबत बोलत नाही परंतू आज महासभा आहे व या महासभेला अधिकारी वर्ग उपस्थित राहत नाही याचा अर्थ कांय?

मा.अतिरिक्त आयुक्त:

महापौर महोदय, श्री.पांचाळ सहा.आयुक्त यांच्या मातोश्रींचे निधन झाल्यामुळे श्री.पांचाळ हजर नाहीत त्याचप्रमाणे श्रीमती अंडे सहा.आयुक्त यांची तब्येत ठिक नसल्यामुळे त्या रजेवर आहेत.तसेच वर्तकनगरच्या सहा.आयुक्त यांचेकडे सचिव पदाचा कार्यभार देण्यात आला आहे त्या याठिकाणी उपस्थित आहेत.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय, आत्ताच सन्मा.भोईर साहेबांनी याठिकाणी चर्चा केली. प्रत्येक सहा.आयुक्त हे त्या त्या कामकाजाबाबत कार्यवाही/कारवाई करणेबाबत सांगतात व त्याप्रमाणे डायरीमध्ये नोंद केली जाते. परंतू त्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जात नाही. तरी मला याठिकाणी उत्तर दयावे की समाजकल्याणबाबत कांय झाले,त्याबाबत आदेश देण्यांत आले आहेत कां?आणि दिले असल्यास त्या आदेशाचे अदयाप पालन करण्यात आले नाही हे याठिकाणी सिध्द झाले आहे. अतिरिक्त आयुक्त म्हणून आपण आदेश दिल्यानंतरसुध्दा आपल्या आदेशाचे पालन होत नसेल तर संबंधितांवर कोणत्या कायदयाअंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे हे याठिकाणी सांगण्यात यावे.

त्याचप्रमाणे सन्मा.भोईर यांनी सहा.आयुक्त श्रीमती अंडे यांचेबाबत जी चर्चा केली आहे त्यासंबंधी माझ्याकडे कांही पुरावे आहेत तरी त्याबाबत चर्चा करण्यास मला संधी देण्यात यावी.

मा.सभागृह नेते :

आयुक्त महोदय आपण आदेश दिले होते परंतू त्यांचे सहा.आयुक्त म्हणून काम आहे की हे काम केले पाहिजे. तरी या कामास कां विलंब झाला, तरी याबाबत कांय कारवाई करण्यात येणार आहे याचीसुध्दा सभागृहास माहिती देण्यात यावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :

महापौर महोदय, स्थायी समितीमध्ये जेव्हा हा विषय चर्चेला आला असता त्यावेळी निर्देश देण्यांत आले होते व त्यावेळी संबंधित सहा.आयुक्त व नविन उपायुक्त श्री.हेरवाडे रुजु झाले होते त्यावेळी त्यांनी याबाबतचा आढावा घेतला होता व संबंधितांना करवाई करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत  व त्याप्रमाणे ते करीत आहेत व अदयापपर्यंत अपेक्षित ही कारवाई केली नसेल तर मी स्वतः तपासणी करतो व संबंधितांचे जाब घेऊन त्याबाबत कारवाई करतो.

श्री.नजिब मुल्ला :

आयुक्त साहेब आपण स्थायी समितीमध्ये आयुक्त म्हणून आश्वासन दिले होते की मंगळवारपर्यंत हा विषय संपलेला असेल. व विषयाचे गांभिर्य पाहुन आपण आदेश पारित केले होते, तरी आदेश पारित केल्यानंतरसुध्दा अदयाप ही कामे झाली नाहीत. तरी आपण त्यांचेवर प्रशासकीय कोणती कारवाई करणार आहात ते सांगावे. ज्यावेळी या सभागृहात एखादा नगरसेवक आवाज उठवतो त्यापुर्वी तो नगरसेवक दहा वेळा त्या सहा.आयुक्तांच्या दालनात जाऊन आलेला असतो. जर आपण त्यांना सांगितले होते की मंगळवारपर्यंत संपवा मी सदस्यांना आश्वासन दिले आहे तरी त्या आदेशाचे पालन का केले जात नाही?

श्री.संजय भोईर :

महापौर महोदय, एखादया अधिका-याने जर कामामध्ये कामचुकारपणा केला तर त्याच्यावर कोणत्याप्रकारची कारवाई केली जाते? मी श्रीमती अंडे- सहा.आयुक्त यांचेबाबत बोलत आहे, त्यांच्या सहा.आयुक्तांच्या कारकिर्दीमध्ये जी चुकीची कामे झाली आहेत,त्यामध्ये अनधिकृत बांधकाम व महिला बचत गट योजनेबाबत. तसेच बिट ऑफीसरच्या वहया तेथुन गायब केल्या असतील व त्यांना सांगितले आहे की मी सांगितल्याशिवाय तुम्ही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करायची नाही. म्हणजेच आयुक्त पदाचा वापर हे सहा.आयुक्त करीत असतील तर अशा अधिका-यांवर काय कारवाई केली जाणार आहे?

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, अतिशय गंभीर आरोप सन्मा.संजय भोईर यांनी लावले आहेत. तरी याबाबत आयुक्तांनी उत्तर दयावे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,सहा.आयुक्तांनी उपआयुक्त मुख्यालय यांना पाठविलेले सात बांधकामे या सहा.आयुक्तांच्या कारकिर्दीमध्ये चालु आहेत,त्यावर उपायुक्तांनी काय कारवाई केली ते प्रकरण दाबुन टाकण्यात आले आहे. जर एखादा नगरसेवक एका गोरगरीबाच्या मदतीसाठी गेला तर आतापर्यंत त्यांच्या चार सुनावण्या झाल्या असत्या. आणि त्याचमुळे मला याठिकाणी श्री.निपुर्ते तसेच श्री.रणखांब उपस्थित पाहिजेत .

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, स्थायी समितीच्या मिटींगमध्ये सर्व प्रभाग समितीचा अहवाल मागितला होता,परंतू त्यावेळी माजिवडा प्रभाग समितीचा अहवाल आला नव्हता. तरी यामागचे कारण कांय आहे? तसेच सन्मा.संजय भोईर यांनी जो आरोप केला आहे त्याचे कांय? वहया गायब झाल्या आहेत कां? आयुक्त महोदय, आम्ही व्हिजिट गेलो हातो कोलशेत येथे तलवामध्ये घर बांधण्यात आलेले आहे. तरी त्याबाबत आपण कांय केले आहे?

श्री.संजय भोईर :

महापौर महोदय,मी बचगटाच्या चर्चेसाठी गेलो होतो त्यावेळी माझी व्हिडीओशुटींग केली होती. त्याचप्रमाणे आपण बांधकामासंबंधी जी चौकशी लावली होती त्या चौकशीचे कांय झाले हे माहित नाही.

श्री.नजिब मुल्ला :

आता समजले आहे की,श्री.निपुर्ते व श्री.रणखांब हे बाहेर बसले आहेत. तरी त्यांना सभागृहात बोलाविण्यात यावे.

मा.सभागृह नेते :

महापौर महोदय, सहा.आयुक्त हे लोकप्रतिनिधींना भेटत नाहीत. प्रभाग समितीच्या मिटींगला ते हजर राहत नाहीत. प्रभाग समितीच्या पहिल्या मिटींगला त्या हजर नव्हत्या.

श्रीमती नम्रता भोसले :

महापौर महोदय आम्हाला एक चांगली व महिला सहा.आयुक्त दिल्यातरी चालेल.राज्य शासनाने दिले म्हणून कोणीही नको.

मा.सभागृह नेते :

याठिकाणी रणखांब साहेबांना बोलवा. पोटोळे साहेबांची यामध्ये कांही चुक नाही त्यांनी प्रोजिसर केलेली आहे. प्रत्येकवेळी बांधकाम खात्यातील अधिका-यांना टारगेट केले जाते. पाटोळे साहेबांना याठिकाणी विचारा की त्यांना आम्ही कितीवेळा आठवण केली आहे व कितीवेळा फोन केले आहे त्यांनी त्यांचे काम पुर्ण केलेले आहे. त्यांच्या विभागाकडून कोपरी प्रभाग समितीला दि.७ जुलै रोजी अहवाल ठेवलेला आहे परंतू त्यावर सहया केल्या जात नाहीत.

मा.महापौर :

सन्मा.सदस्यांना सांगण्यात येते की रणखांब साहेब बाहेर गेले आहेत तरी आता जेवणाची सुट्टी करत असुन पुन्हा ४.०० वा सभा पुर्ववत चालु करण्यात येईल. व त्यावेळी श्री.रणखांब तसेच श्री.निपुर्ते यांना सभागृहात बोलाविण्यात येईल.

दुपारी ठिक ३.०० वाजता जेवणाची सुट्टी जाहिर करण्यात येते.

**जेवणाच्या सुट्टीनंतर सभा ठिक ४.१० वाजता सुरु होते.**

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, रणखांब यांचे काय झाले? ज्या विषयासाठी आपण जेवणाची सुट्टी केली होती त्याचे काय झाले?

**मा.महापौर सो. :-**

तोपर्यंत विषय सुरु करु.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, नविन प्रभाग समिती झाली पण अध्यक्षांना बसायला केबिन नाही, गाडी नाही, स्टाफ नाही काय चालले आहे? ती घटना दुरुस्ती आहे. मा.महापौर महोदय, हे योग्य आहे का? सचिव उत्तर दया. केबिनचे काय झाले? नविन प्रभाग समिती बनवताना तुम्ही त्याचे नियोजन का केले नाही?

**श्रीम. वर्षा पाटील :-**

नविन प्रभाग समितीची स्थापना होऊन आता एक महिना झाला. बसायला केबिन नाही. मी आणि मानकर मॅडमनी धावपळ करुन मा.आयुक्त सो. यांची मान्यता घेतली आहे. साहेबांनी मान्यता दिलेली असून ते काम आतापर्यंत का थांबलेले आहे? बाकीच्या नगरसेवकांनी तक्रारी घेऊन कोणाकडे जायचे? मा.महापौर महोदय, काम का थांबवले आहे त्याचे मला उत्तर पाहिजे. मा.आयुक्तांची मान्यता असूनही काम थांबलेले आहे. जर तुमचे प्रोव्हीजन नव्हते तर प्रभाग समिती स्थापन का केली?

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

वहिनी, घटना दुरुस्ती केलेली आहे. अंमलबजावणी हयांनी केलीच पाहिजे. प्रशासनाचे काम आहे.

**श्रीम. मानकर, सहा.आयुक्त, वर्तकनगर प्रभाग समिती :-**

मा.महापौर महोदय, पाटील मॅडम, अध्यक्षा म्हणून निवडून आल्यानंतर प्रभाग समितीमध्ये बसण्याची व्यवस्था नव्हती हे खरं आहे. त्या अनुषंगाने सावरकरनगर येथील एक महापालिकेची वास्तू पाहिली आहे. ती जागा पाटील मॅडमना दाखवून कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम यांच्याकडून केबिनचे एस्टीमेट तयार करुन प्रशासकिय मान्यता मी स्वतः आयुक्त साहेबांची घेतली आहे आणि आता त्या केबिनचे जे काम करायचे आहे त्याचे एस्टीमेट तयार करुन ते बजेटसाठी गेले आहे एवढे मला माहिती आहे. त्याच्यावर बजेट का पडत नाही याची कल्पना मला नाही.

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, त्या केबिनसाठी सरासरी पाच ते सहा लाख रुपये खर्च आहे. त्याच्यासाठी बजेटची वाट बघायची अजून बजेटवर सहया व्हायच्या आहेत. प्रशासनाची कामे असतील तर ती तात्काळ केली जातात.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आपण कितीतरी कामांना कार्योत्तर मंजूरी घेतो ही तर घटना दुरुस्ती आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, ताबडतोब कामाला सुरुवात करतोय ना?

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्तांनी मान्यता देऊनही काम का थांबलेले आहे याचे मला उत्तर मिळावे. मी काल पाडगांवकर यांच्याकडे गेले होते त्यांनी मला उत्तर दिले की, १० प्रभाग समितीचे

माझ्याकडे लेटर येतील त्याच्यावर आम्ही बजेट टाकू. बजेट पडणार कधी आणि प्रभाग समिती होणार कधी? जर याचे काहीच प्रयोजन नव्हते ते प्रभाग समिती स्थापन का केल्या?

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, बजेटसाठी थांबवले आहे?

**मा.अतिरिक्त आयुक्त सो.:-**

मा.महापौर महोदय, हया विषयाबाबत मी मा.आयुक्त साहेब आल्यानंतर लगेच त्याच्याशी बोलून मार्ग काढतो.

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, मीं स्वत: आणि मानकर मॅडम मा.आयुक्तांशी बोललो आहोत. आयुक्तांनी त्याला मान्यता दिलेली आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, त्या प्रभाग समिती अध्यक्षा आहेत त्यांना मान-सन्मान आहे. साहेब, आपल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांना बोलवा. त्या एवढं वारंवार बोलत आहेत मागून काहीच हालचाल दिसत नाही. कार्यकारी अभियंता किंवा नगर अभियंताना बोलवा ते काम चालू करु शकतात. मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी आयुक्त म्हणून बसल्यानंतर आयुक्तांची परवानगी आहे. मग आयुक्त म्हणून बसल्यानंतर तात्काळ आदेश दयायला पाहिजे होते. मा.महापौर महोदय, नस्तीसकट मागवा म्हणजे सभागृहाला कळेल.

**मा.महापौर सो. :-**

मॅडम तुम्ही खाली बसा. लाला साहेब, आल्यानंतर तुम्हाला उत्तर दिले जाईल.

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, माझे लाला साहेबांशी बोलणे झाले आहे. अवसरमल साहेबांशी मी बोलले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून मी आणि मानकर मॅडम दोघीच प्रयत्न करतोय. बाकी कोणीही प्रयत्न करत नाही. मानकर मॅडम माझ्याबरोबर आहेत म्हणून तेवढे तरी चालले आहे. सगळे जण मानकर मॅडमची मागणी करतात सहा. आयुक्त म्हणून त्या आमच्याकडे दया. त्या कुठे-कुठे सहा.आयुक्त म्हणून बसणार आहेत.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, एवढा मोठा काय प्रश्न निर्माण झाला आहे? प्रपोजल तयार झाले आहे. मा.आयुक्तांनी मान्यता आहे. पाच ते सहा लाख रुपयांच्या केबिनचा प्रश्न महापालिकेत एवढा मोठा झाला आहे अडचण काय आहे?

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, दिड-दिड कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर होतात. सात लाखाची फाईल मंजूर होत नाही.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, आपण सांगा काम चालू करायला परवानगी देतो आणि विषय संपवा. कशासाठी वेळ घालवता? महापौरांच्या अधिकारात परवानगी दया.

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, मला उत्तर मिळत नाही तोपर्यंत मी खाली बसणार नाही.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, मला वाटते आपण तातडीने मा.आयुक्त साहेबांना आदेश दयावेत की, उदया पासून काम सुरु झाले पाहिजे विषय संपला.

**मा.महापौर सो. :-**

प्रशासनाला आदेश देण्यात येतात की, फाईल तयार झालेली आहे उदयाच्या उदया ते काम चालू करण्यांत यावे.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, त्या कार्यालयाच्या कामाची सुरुवात आपण आणि मा.आयुक्त साहेबांनी जाऊन श्रीफळ वाढवून करावी अशी माझी विनंती आहे आणि सोबत अध्यक्षांना घ्यावे म्हणजे ते काम चालू होईल.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, हया केबिनचे काम सुरु होईल. पंरतू वर्तकनगर प्रभाग समितीच्या वर जात पडताळणीचे ऑफिस आहे त्या ऑफिसला आपण पर्यायी व्यवस्था करा आणि त्या ठिकाणी ती कायमची प्रभाग समिती करण्यात यावी.

**श्रीम. मानकर ,सहा.आयुक्त, वर्तकनगर प्रभाग समिती :-**

मा.महापौर महोदय, हयाबाबतीत मा.आयुक्त साहेबांशी चर्चा झालेली आहे. मा.आयुक्त साहेब यांनी जे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे मी स्थावर मालमत्ता विभागाला पत्र दिलेले आहे की, जात पडताळणीच्या कार्यालयाला जी काही रेग्यूलर प्रोसेस असेल ती पूर्ण करुन ती जागा रिक्त करुन घ्यावी.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, जागा रिक्त करुन घ्यावी जेणेकरुन तिथे काम करता येईल.

मा.महापौर महोदय, आता रणखांब साहेब. आले का रणखांब साहेब?

**श्री. अशरफ पठाण :-**

मा.महापौर महोदय, मुंब्रा प्रभाग समितीचे सुध्दा असेल हाल आहेत. अध्यक्ष साहेब बसले आहेत. ज्या ठिकाणी आम्ही बसतो त्या ठिकाणी टॉयलेटचे पाणी येते. तरी कृपा करुन आमच्याकडे सुध्दा लक्ष दयावे.

**श्रीम. वर्षा पाटील :-**

मा.महापौर महोदय, आधी एकच विषय क्लीअर करा. आमच्या प्रभाग समितीचा विषय आधी क्लीअर करा. उदया महापौर साहेब, तिथे यावेत आणि त्यांनी श्रीफळ वाढवावा अशी विनंती आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आताच सन्मा.सदस्य श्री. अशरफ पठाण यांनी जी सुचना केली आहे. लाला साहेब, आपण स्वत: लक्ष घालून मुंब्रा प्रभाग समिती अध्यक्षांच्या केबिनमध्ये सांडपाण्याची जी गळती होत आहे त्या ठिकाणचे काम तातडीने सुरु करण्यांत यावे. त्या ठिकाणचा कार्यकारी अभियंता लक्ष घालत नाही.

मा.महापौर महोदय, आता रणखांब साहेब आले आहेत. माझ्याकडे काही फोटो उपलब्ध झाले आहेत. मा.आयुक्त साहेबांनी स्वत: घोडबंदर रोड येथे सर्व्हीस रोड व इतर येथे अतिक्रमणे निष्काषित करणेसंदर्भात स्वत: लक्ष घालून सर्व्हीस रोड तयार करण्यास घेतला आहे. स्थायी समितीमध्ये आम्ही कासारवडवली नाक्यावर मेनरोडवर गाळे बांधण्यात आले आहेत त्याबाबत चर्चा केली होती. जिथे रस्ता रुंदीकरण कामाचे टेंडर पास झालेले आहे. तिथे गाळे बांधण्यात आले आहेत. त्याबाबत मला रणखांब साहेबांना एवढेच विचारायचे आहे की, आपल्याला मा.अतिरिक्त आयुक्त साहेबांनी अतिक्रमणा संदर्भात दोन-तीन प्रकरणाबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले होते का?

**श्री. रणखांब, उप आयुक्त, अतिक्रमण विभाग :-**

मा.महापौर महोदय, चौकशीचे जे आदेश दिले होते त्या चौकशीच्या आदेशाप्रमाणे मी पूर्णपणे चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

आपण अहवाल कधी व कोणाकडे सादर केला आहे. साहेबांना सादर केला आहे का आणि कुठल्या महिन्यात केला आहे.

**श्री. रणखांब, उप आयुक्त, अतिक्रमण विभाग :-**

मा.महापौर महोदय, एप्रिल महिन्यांत केला आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, त्या प्रभाग समितीबाबत मा.स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. आणि त्यात सहा.आयुक्तांनी सुध्दा त्यांचा अहवाल सादर करण्याबाबत स्थायी समितीमध्ये ठराव झाला होता. सहा.आयुक्तांनी त्यांचा अहवाल सादर केला आहे का? मला वाटते त्यावेळी बुरपल्ले यांनी तिथे नव्याने चार्ज घेतला होता.

**श्र नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, तिथे अंडे मॅडम, सह.आयुक्त होत्या पण त्यांचा चार्ज दोन दिवस आधी बुरपल्ले साहेबांनी घेतला होता. मला असे विचारायचे आहे की, त्यांनी अहवाल सादर केला आहे. त्या अहवालामध्ये आपल्याला काय आढळले? त्यातील ठळक गोष्टी आम्हाला इथे सांगितल्या तर बरे होईल.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, एक अहवाल रणखांब साहेबांचा आहे आणि बुरपल्ले साहेबांनी सुध्दा त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. बुरपल्ले साहेब, तुम्ही तुमचा अहवाल दिला आहे का?

**श्री. रणखांब, उप आयुक्त, अतिक्रमण विभाग :-**

मा.महापौर महोदय, मी माझे आधी क्लीअर करतो. मला जे चौकशीचे आदेश दिले होते त्याप्रमाणे चौकशी करुन मी माझा अहवाल दिलेला आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, आपल्याकडे अहवाल आला म्हणजे आपण अभ्यास केला असेल.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, त्यांनी पंधरा दिवसांत खुलासा देणे अपेक्षित आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, पंधरा दिवसांत खुलासा देणे अपेक्षित आहे. ठाणे महानगरपालिकेचा उप आयुक्त कुठल्यातरी इतर महापालिकेत तो आयुक्त म्हणून काम केलेला अनुभवी असतो. आता या ठिकाणी अतिरिक्त आयुक्त म्हणून बसलेले पाटील साहेब सुध्दा कुठेतरी आयुक्त दर्जाचे काम करु शकतात. कल्याणला त्यांच्याकडे पदभार होता. आज आपाल्या महापालिकेची ग्रेड सी आहे म्हणून इथे ते उप आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्त म्हणून काम करत आहेत. त्याचा अहवाल काय चुकीचा असू शकतो? त्यांनी त्या अहवाल काय-काय निकष लावले आहेत. अतिक्रमण झाल्याचे पुरावे आहेत. रस्त्यावर झालेल्या अतिक्रमावर कारवाई झाली नाही त्यांच्यावर तुम्ही का खुलासे मागता? का कारवाई करत नाही? मा.महापौर साहेब, जर एप्रिल महिन्यात नगरसेवकाचा सहा.आयुक्तांनी पाठविला रिपोर्ट आला असता तर त्या नगरसेवकाला आतापर्यंत चार सुनावणी, त्याच्यावर निकष, टोटल लावून आज सभागृहात विषयपत्रिकेवर विषय आला असता.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, पहिला जो रिपोर्ट आहे .. .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

टोटल किती रिपोर्ट तुमच्याकडे आले?

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, आमच्याकडे टोटल चार रिपोर्ट आहेत. त्यापैकी एक वारंवार सभांना गैरहजर किंवा लेट येणे याबाबत आहे. आणि एक आहे तो माजिवडा-मानपाडा येथे जो कार्यक्रम आयोजित केला होता त्यात त्या उपस्थित झाल्या नाहीत. याबाबत सुध्दा आपण त्याच्याकडून खुलासा मागितला होता.

**श्री. नजीब मुल्ला :-**

चार पैकी दोन झाले. दुसरे दोन पण सांगा.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, तिसरा नवरत्न अनधिकृत बारच्या कारवाईबाबत आहे

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आता बघा हे इथे सिध्द होत. म्हणजे सर्वप्रथम गांर्भियाने अनधिकृत बांधकामाचे सांगायचे ते सर्वात शेवटी सांगितले. साहेबांनी आपल्याकडे कारवाईसाठी जे चार अहवाल पाठविले ते वेगवेगळे असतील.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, त्यातील पहिला जो आहे तो सन्मा.नगरसेवक श्री.लॉरेन्स डिसोझा यांच्या पत्राच्या अनुषंगाने रणखांब साहेबांनी जो रिपोर्ट सादर केला त्या संबंधीचा आहे. आणि दुसरा नवरत्न अनधिकृत .. .. ..

केली जाते? आणि स्थायी समितीमध्ये ठरविल्याप्रमाणे सहा.आयुक्तांनी रिपोर्ट दिलेला आहे. त्यामध्ये कारवाई झालेली आहे का? त्या बांधकामांना नोटीसा दिलेल्या आहेत का आणि जर दिल्या नसतील तर त्या कलमान्वये त्यांच्यावर कारवाई केली का? असा माझा प्रश्न आहे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी विनोद डवले म्हणून सहाय्यक आयुक्त होते. ते पदनिर्देशित अधिकारी होते. त्यांना आपण का सस्पेंड केले त्याचे कारण सांगा.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, ती फाईल येईपर्यंत मला काळे साहेबांनी सांगावे की, महाराष्ट्र शासनाचे राजपत्र २००८ मध्ये अनधिकृत बांधकाम झाल्यावर नगरसेवक कसे दोषी ठरु शकतात. त्याचप्रमाणे त्या राजपत्रात अधिका-यांच्या बाबतीत पण स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. वरिष्ठ अधिका-यांनी त्याच्या अधिपत्याखाली काम करणा-या अधिका-यावर ठपका ठेवला तर त्याचा पगार, सस्पेंड करण्याबाबत नियम दिलेला आहे. तो आतापर्यंत का लागू करण्यात आलेला नाही त्याचे पण उत्तर पाहिजे. मा.महापौर महोदय, काळे साहेबांनी सन २००८ चे राजपत्रातील ठळक बाबी या ठिकाणी सभागृहात वाचून दाखवावे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, विनोद डवलेना आपण सस्पेंड का केले त्याचे कारण सांगा. तोच नियम इतरांना लागू आहे की नाही ते सांगा.

**श्री. नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, आज या ठिकाणी योगा-योगाने पाटील साहेब इथे हजर आहेत. लकी कंपाऊंडच्या वेळी पाटील साहेबच मा.आयुक्त म्हणून काम पाहत होते. लकी कंपाऊडच्या वेळी याच राज९ज्ञाचा आधार घेऊन आपण आपल्या लोकांना आत मध्ये पाठविले होते. तर मग हया का नाहीत? काळे साहेब, बरोबर आहे ना? कारण मी तुमची मंजूरी वाचलेली आहे म्हणून विचारले. डवलेंच्या बाबतीत पण सांगा आणि राजपत्र सुध्दा वाचून दाखवा. लागू का करत नाही. ही दुप्पटी भुमिका कशासाठी? निवडून आलेला माणूस आंगूठा छाप नसतो.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, डवले प्रमोशनने पुढे गेला असता त्याला प्रशासनाने घरी बसवले आहे. तसेच रणखांब साहेबांनी जो रिपोर्ट दिला आहे तो हया ठिकाणी वाचला तर बरे होईल.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, सन २००८ चे परिपत्रक त्यांना का लागू केले नाही याचे पण आम्हाला उत्तर पाहिजे. काळे साहेब, मला २००८ च्या परिपत्रकाची आताच्या आता कॉपी पाहिजे मला ती वाचायची आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, ॲमेडमेंटची कॉपी मागवून घ्या.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, राजपत्रातील ॲमेडमेंटची कॉपी पाहिजे. निपुर्ते साहेब, ते मागवून घ्या. साहेब, तुम्ही फोटो पाहिला आहे तुम्ही कधी कारवाई करणार? उप आयुक्त अतिक्रमण पण आले आहेत.

**मा.महापौर सो. :-**

बुरपल्ले साहेबांनी काय रिपोर्ट दिला आहे तो आपण ऐकून घेऊ.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, रस्त्यावर अनधिकृत गाळे झालेले कधी तोडणार? त्याच्यामुळे रस्त्याची रुंदी थांबली आहे. निपुर्ते साहेब, वडवलीच्या इथले कधी तोडणार आहात?

**श्री. बुरपल्ले, सहा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदय, मा.स्थायी समितीमध्ये ठाणे शहरातील सर्व अनधिकृत बांधकामाबाबत सविस्तर चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती हयांनी १ जानेवारी पासून त्या त्या प्रभाग समितीचा अहवाल त्या त्या सहा.आयुक्तांनी स्थायी समितीपुढे सादर करावा असे आदेश दिले होते. माझ्याकडे माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीचा चार्ज होता. त्यामुळे मा.स्थायी समिती सभापतींच्या आदेशाप्रमाणे सभागृहाने जे काही आदेश दिले होते त्याप्रमाणे जो काही वस्तूस्थिती अहवाल होता तो मी उप आयुक्त अतिक्रमण हयांच्याकडे सादर केला आहे. मा. महापौर महोदय, जी काही वस्तूस्थिती होती ती मी लेखी स्वरुपात सादर केली आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

अहवाल होता अहवाल होता आम्ही दहा वेळा ऐकले आहे पण अहवालामध्ये काय सिध्द झाले ते सांगा. आपल्या निदर्शनास काय आले?

**मा.महापौर सो :-**

अहवाल होता-अहवाल होता पण तो काय होता अनधिकृत बांधकामा संदर्भात होता कशाबद्दल होता?

**श्री. बुरपल्ले, सहा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदय, मा.उप आयुक्त यांनी लेखी आदेश दिले होते सोबत एक तक्ता दिला होता. त्या तक्त्यामध्ये त्यांनी जी काही पाच-सहा मुद्दयाबाबत माहिती मागितली होती. त्यात एखादे बांधकाम झाले असेल तर ते कुठल्या तारखेला झाले आहे, बांधकामाचे स्वरुप काय आहे, बांधकामधारकाचे नांव काय आहे, त्याला नोटीस बजावली आहे का, एमआरटीपी अन्वये गुन्हा दाखल केला आहे का, सद्यस्थितीत त्या बांधकामाची वस्तूस्थिती काय आहे? याप्रमाणे माहिती मागवली होती तो अहवाल सर्व सहा.आयुक्तांनी सादर केला त्याप्रमाणे मी माझ्या प्रभाग समितीचा अहवाल सादर केला.

**मा.सभागृह नेते :-**

त्या काळात अनधिकृत बांधकामे झाली होती का?

**श्री. बुरपल्ले, सहा.आयुक्त :-**

मा.महापौर महोदय, मा.स्थायी समिती सभागृहाने जे आदेश दिले होते त्यानुसार जी काही वस्तूस्थिती होती ती मी लेखी स्वरुपात सादर केलेली आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आज इथे उप आयुक्त, अतिक्रमण उपस्थित आहेत. हयाच्याबाबतीत स्थायी समितीमध्ये त्यांना सुध्दा जबाबदारी देण्यात आली होती. आम्ही आमच्याकडेचे फोटोच आताच सादर केले आहेत. राजपत्र २००८ प्रमाणे त्यांच्यावर सुध्दा कारवाई होणे बंधनकारक आहे. दहा-दहा वेळा सांगून सुध्दा कामे होत नाहीत. नगरसेवकांनी केलेली विनंतीत लक्ष घालत नाही. पण नगरसेवकाचे नांव घेऊन जर कोणी माहिती अधिकारवाला खोटं काही देईल तर लगेच त्याची नोंद घेऊन नोटीस वगैरे घेऊन हजर. मा. महापौर महोदय, आता रिपोर्ट आला आहे वाचून दाखवायला सांगा. नाहीतर मुळ विषय राहून जाईल. मॅडम मी जे विचारले आहे त्याचे उत्तर आधी दया.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, श्री. डवले हे रजेवर जाताना विना परवाना म्हणजे मा.आयुक्तांना कोणतीही पूर्व सुचना न देता रजेवर गेले आणि त्याप्रमाणे इलेक्शन कमिशनचे त्या विभागामध्ये काम करण्याचे जे काही डायरेक्शन होते हे दोन्ही त्यांनी फॉलो न केल्यामुळे त्यांना आपण महापालिकेच्या सेवेतून सस्पेंड केलेले आहे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, त्यावेळी त्यांना पेपरमध्ये कुठल्या तरी अनधिकृत बांधकामाची बातमी आली होती म्हणून त्यांना तुम्ही सस्पेंड केले होते. त्यानंतर ते परत हजर झाले होते. तुम्ही आता सभागृहाची दिशाभूल करत आहात.

**श्री. नजीब मुल्ला :-**

तुम्ही त्यांना लेखी स्वरुपात काय कारण दिले आहे.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, आपण त्यांना निलंबनाचा आदेश काढलेला आहे त्यामध्ये कुठल्या नियमाप्रमाणे आपण त्यांना निलंबित केले आहे .. .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

त्यात तुम्ही हेच कारण दिले का इलेक्शन कमिशनचे आदेश फॉलो केले नाहीत.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, आपण आपल्या निलंबनाच्या ऑर्डरमध्ये कारण नमूद करत नाही.

**श्री. नजीब मुल्ला :-**

रिर्पोटींगमध्ये?

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, रिर्पोटींगमध्ये इलेक्शन कमिशनच्या कामाचा अवमान .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

अनधिकृत बांधकामाचा कुठेही उल्लेख नाही?

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, टिप्पणी .. .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

तपासायला लागेल ना. ती फाईल सुध्दा मागवून घ्या. तुम्ही थांबा, कोणाला तरी आणायला सांगा. ठिक आहे, तोपर्यंत रणखांब साहेबांचा रिपोर्ट या ठिकाणी वाचून दाखवावा. त्यानंतर आपला तो कायदयाचा मुद्दा येईल. वरिष्ठांनी तो कायदा का डावलला हा प्रश्न पण समोर येतो. विचारुन घ्या कुठला विषय वाचायचा आणि कुठला नाही. दोन-तीन ठळक मुद्दे वाचणार.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, येऊ दया समोर. लोकप्रतिनिधींना बदनाम करण्याचा यांनी ठरविले आहे. लोकांना कळू दया काय असतं ते.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, मा.उप आयुक्तांनी त्यांचा जो अहवाल प्रशासनाकडे सादर केलेला आहे त्यात पुढील बाबी नमूद आहे.

१) कर्मचा-यांना अत्यंत उध्दटआणि उर्मट अशी वागणूक दिली जात असून कार्यालयीन कामात जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत.

२) महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या एकंदरीत माहिती नुसार महापालिकेच्या आर्थिक नुकसानाबाबत कोणतीही काळजी न घेता अत्यंत बेजबाबदारपणे कामकाज आहे.

३) बांधकाम विभागाच्या अधिकारी यांना त्यांचा अहवाल पाहता नागरिकांच्या कामाबाबत अत्यंत उदासिनता दाखवली जात असून त्यांच्या कामामध्ये जाणीवपूर्वक अडथळा होत असल्याचे दिसून येते.

४) एकूण सहा बीट मुकादमांचे समक्ष घेतलेले जाब-जबाब पाहता अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्या ऐवजी सदर बांधकामांना सहाय्यभूत होईल अशी परिस्थिती निर्माण केली जात असल्याचे दिसून येत असून सदरच्या प्रभाग समितीमध्ये भविष्य काळात एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही ही गंभीर बाब नमूद करण्यात येत आहे.

५) सहा.आयुक्त, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती हया वरिष्ठांबरोबर देखिल अत्यंत उध्दट वर्तन करत आहेत. आपणाकडून प्राप्त झालेल्या ओदशानुसार प्रभाग समितीमध्ये कर्मचा-यांचे जाब-जबाब करण्याचे कामकाज चालू असताना सहा.आयुक्त हे संबंधित कर्मचा-यांना त्यांच्या दालनात बोलावून दमदाटी करत असल्याचे संबंधित कर वसूली कर्मचा-यांनी निदर्शनास आणले आहे.

६) उप आयुक्त, अतिक्रमण व निष्कासन विभाग, हयांनी त्यांच्याकडील ठामपा/अतिनि/उपआ-३१ दि.७/०४/२०२४ रोजी सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, माजिवडा-मानपाडा प्रभाग हयांना एकूण १४ आदेश दिल्यानंतर देखिल सदर पत्रातील नमूद अतिक्रमण-अनधिकृत कामावर कार्यवाही केल्याचा अहवाल व संबंधितांवर गुन्हा दाखल केल्याचा अहवाल त्यांच्याकडे सादर केलेला नाही.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, मॅडम, आता हया ठिकाणी आपण जो अहवाल वाचून दाखवला. सन 2008 चे जे राजपत्र आहे ते अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत अधिका-यांना दोषी ठरविण्यासाठी लागू होतो की नाही ते सांगा. मॅडम, आपण कार्मिक विभाग आणि आस्थापना विभाग सांभाळता बरोबर. काळे साहेब, आपण उत्तरावर लक्ष ठेवा. किंवा उप आयुक्त अतिक्रमण यांनी सांगावे की, सन 2008 चे राजपत्र अनिधकृत बांधकामासंदर्भात अधिकारी दोषी आढळल्यास तो लागू होतो की नाही?

**मा.विरोधी पक्षनेते :-**

आधी कलम 397 चा 2 प्रथम वाचा. आणि हयंना तो लागू होते की , नाही ते सांगा.

**श्री. निपुर्ते, उप आयुक्त, अतिक्रमण :-**

मा.महापौर महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 397 अ चा (2) मी या ठिकाणी वाखून दाखवतो. ( कलम 397 अ (2) वाचून दाखविला. )

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, राजपत्रात जी प्रोव्हीजन करण्यांत आली आहे. त्याची एक कॉपी आपल्याकडे मागितली होती. त्या राजपत्रात त्यांना तुम्ही किती वेळा टर्मिनेट करायचे, सस्पेंड करायचे, जर ते प्रोफेशनवर असतील तर त्यांचा पगार किंवा इंक्रीमेंटबाबत सुध्दा 2008 च्या राजपत्रात स्पष्टपणे उल्लेख आहे. काळे साहेब, त्या अॅक्टच्या अनुषंगाने त्याची प्रोव्हीजन त्याचे डिटेल दिलेले आहे. तो आपण का लागू केला नाही? मला सांगा त्यांना आपण का संरक्षित केले आहे? आपल्या महापालिकेच्या आस्थापना विभागाने त्यांना पूर्णपणे पाठींबा का दिला आहे किंवा लपविण्यांत आले आहे? आणि त्या अनुषंगाने कारवाई का केली नाही. साहेब, मला त्याचे उत्तर अपेक्षित आहे.राजपत्रानुसार कलम लागू हात असताना

तुम्ही तो कलम लागू करुन त्यांच्यावर तांतडीने कारवाई का केली नाही त्याचे उत्तर मला अपेक्षित आहे तुम्ही तो कायदा का लागू केला नाही.

**मा.आयुक्त सो. (मा.अतिरिक्त आयुक्त सो) :-**

मा.महापौर महोदय, अशाप्रकारे एखादा कर्मचारी किंवा अधिकारी यांच्यावर कारवाई करायची असली तर त्यानुसार महाराष्ट्र सिव्हील सर्व्हीस डिसीप्लीन अँड अपिल रुल्सनुसार कारवाई करण्यांत येते. त्यानुसर त्यांचा अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी हे प्रकरण आस्थापना विभागाकडे पाठविले होते. या अनुषंगाने त्यांना ज्ञापन, दोषारोप पत्र या सर्व गोष्टी तयार करणे हे त्यांच्याकडून अपेक्षित होते. त्यांच्याकडून ही प्रोसेस झाल्यानंतर खातेनिहाय चौकशी झाल्याशिवाय हयाबद्दल .. .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, राजपत्रात स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे, कायदयाने तरतूद दिलेली आहे. त्याचे सायस्टेशन्स आपल्याकडे आहेत. तिथे कुठेही खातेनिहाय चौकशीचा संबध नाही. अनधिकृत बांधकामासंदर्भात कठोरपणे कारवाई करण्याचे आदेश निर्देश शासनाकडून आपल्याकडे देण्यात आलेले आहेत. कायदयात स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, तुम्हाला अहवाल प्राप्त झाला अहवाल प्राप्त झाल्यावर तांतडीने कारवाई व्हायला पाहिजे होती. आज तीन महिन्यानंतर तुम्हाला उत्तर अपेक्षित आहे. साहेब, खातेनिहाय चौकशीचा उल्लेख कुठे आहे ते आम्हाला दाखवा. तशाप्रकारचा उल्लेख कायदयात तरी नाही. साहेब, तुमच्या सर्व्हीस रुलमध्ये दिलेले आहे ते वाचा आणि 2008 चे राजपत्र वाचा.

**मा.आयुक्त सो. (मा.अतिरिक्त आयुक्त सो) :-**

हया प्रकरणी कार्यवाहीसाठीच प्रकरण आस्थापना विभागाकडे पाठविले होते.

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, तुम्ही खातेनिहाय चौकशी म्हणालात. कायदयात खातेनिहाय चौकशीचा संबंध कुठे आहे? हया अतिक्रमणाच्याबाबतीत आपण 2008 चे राजपत्र का वाचत नाही? साहेब, ते मागवा एक मिनिट लागेल. तो वाचा तुम्हाला सगळं क्लीअर होऊन जाईल. कुठे आपला निष्काळजीपणा झाला आहे ते आपल्याला दुरुस्त करता येईल. साहेब, आम्हाला तुमच्यावर आरोप करायचे नाहीत. पण मुद्दामहून जे रेंगाळत ठेवले आहेत त्याबाबत आजच्या-आज तांतडीने कारवाई करता येईल. साहेब, खातेनिहाय चौकशीचा संबंधच नाही.

**मा.सभागृहनेते :-**

रणखांब साहेबांनी आणि बुरपल्ले साहेबांनी जो अहवाल दिला होता त्याची तारीख काय?

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, बुरुपल्लेच्या अहवालत सात बांधकामे दिली आहेत. मा.महापौर महोदय, निपुर्ते साहेब, जर लक्ष घाला. सात बांधकामाचे मी तिथे फोटो दिलेले आहेत.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आपण जर हया महापालिकेचा इतिहास बघितला आणि सभागृहातील आयुक्तांची कार्यवाही आणि कारवाई हयाचे जर आपण अवलोकन केले तर कारण मी पहिल्यांदाच नगरसेवक झालेला आहे. पण काही जणांची ही तिसरी वेळ आहे तर काही जण जेष्ठ सदस्य आहेत की जे तीन-तीन,चार-चार वेळा निवडून आलेले आहेत. मा.महापौर महोदय, रंगनाथ वाघ हया सहा.आयुक्तांना अशी तक्रार आल्यानंतर तात्काळ निलंबीत केले गेले. तद्नंतर उप आयुक्त परिमंडळ हयांनी अहवाल ठेवला. त्यानंतर उप आयुक्त (मु.) अतिक्रमण हयांनी त्या अहवालावर शिक्कामोर्तब केलं. त्यावेळेचे अतिरिक्त आयुक्त गुप्ता साहेब हयांनी तो अहवाल त्यावेळचे मा.आयुक्त राजीव साहेब हयांच्याकडे पाठवला. राजीव साहेबांनी हया महासभेसमोर ते प्रकरण पाठवून त्यांना आपण सक्तीने सेवानिवृत्तीवर

पाठवला. राजीव साहेबांनी हया महासभेसमोर ते प्रकरण पाठवून त्यांना आपण सक्तीने सेवानिवृत्तीवर पाठवले. पण हया सर्व प्रोसिजर करताना आपण त्या सहा.आयुक्तांना प्रथम तात्काळ निलंबीत केले होते. मा. महापौर महोदय, हा एक विषय झाला आणि दुसरा विषय असा आहे की, स्थानिक अधिकारी आणि प्रतिनियुक्तीवरील अधिकारी हयांच्यात सातत्याने दुजाभाव दाखवला जातो हा माझा स्पष्ट आरोप आहे. प्रत्येक वेळी हया पध्दतीने कामकाज चालणार आहे का?

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, हयाचा अर्थ असा होतो की, जे महानगरपालिकेचे अधिकारी आहेत त्यांच्यावर तुम्ही तात्काळ कारवाई करता. पण जे शासनाकडून आलेले अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करताना तुम्ही टाळाटाळ करता असा या ठिकाणी अर्थ होतो.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आम्ही आधीच बोललो होतो. दुटप्पी भुमिका आहे. कायदयात स्पष्टपणे तरतूद दिलेली आहे. त्यात तुम्हाला तातडीने कारवाई करावी असा उल्लेख असताना खातेनिहाय चौकशीची गरजच काय? आता हयांनी सांगितल्याप्रमाणे वाघ सहा.आयुक्तांप्रमाणे प्रोसेस का केली नाही? आपल्यावर आम्हाला संशय येतो. अशी दुटप्पी भुमिका का? साहेब, तातडतोब निलंबित करा.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, हे मी मागच्या बोर्डातले सांगितले. आता हया बोर्डामध्ये लकी कंपाऊंडमध्ये जी दुर्घटना घडली. हया सभागृहामध्ये आपण सहा-सहा तास चर्चा केली. त्या चर्चेनंतर मी महासभेला काही प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नांची दिलेली उत्तरं, शासनाला पाठविलेला अहवाल हयाबद्दल आयुक्त असिमकुमार गुप्ता साहेबांनी हया सभागृहात सांगितले की, पूर्वीच्या आयुक्तांनी घेतलेल निर्णय हा मला बंधनकारक आहे. त्यामुळे हयाच्यात नविन सुधारणा होऊ शकत नाही आपण शासनाकडे जा. ती बैठक झाली होती. नजीब मुल्ला साहेब, आपण होतात, विरोधी पक्षनेते होते, गटनेते होते. आदरणीय सभागृहनेत्यांना याची कल्पना नव्हती. मा.महापौर महोदय, तुम्हाला कल्पना नव्हती: तुम्ही मला भेटला होतात. ज्यावेळी मी लेखी आश्वासनाची मागणी केली तेंव्हा मला आश्वासन दिले नव्हते. मला सांगितले तुम्ही शासनाकडे दाद मागा. मी तत्कालीन उप आयुक्त अतिक्रमण, श्री. प्रकाश बोरसे हयांच्याबाबत महापालिकेने तयार केलेला आदरणीय पाटील साहेबांच्या सहीचा तो अहवाल आहे. उप आयुक्त (मु.) अतिक्रमण हयांनी तयार केलेला तो अहवाल आहे. जर तत्कालीन उप आयुक्त अतिक्रमण श्री. प्रकाश बोरसे हयांनी जर त्यावेळी त्या इमारतीवर कारवाई केली असती तर लकी कंपाऊंडची 74 लोक गेली नसती आणि एवढे अधिकारी अडकले नसते. आणि ज्या कलमाखाली ते अधिकारी अडकले गेले आहेत ती कलम देखिल त्यांना लावली गेली नसती. मा.महापौर महोदय, मी शासनाकडे पत्र व्यवहार केला आणि शासनाच्या आदेशाने एक पत्र आहे आहे त्या पत्राला आज सहा महिने व्हायला आलेत. श्री. प्रकाश बोरसे हयाच्याबाबत नगरसेवक संजय घाडीगांवकर हयांनी जो पुरावा दिलेला आहे, जो अहवाल दिलेला आहे. त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ पाठवावा. त्याच्या उपर नगर विकास विभागाने हयांनी एक स्मरणपत्र पाठविले त्याबद्दल देखिल उप आयुक्त अतिक्रमण मुख्यालय निपुर्ते साहेब हयांच्याकडे मी सातत्याने पाठपुरावा केला पण अद्यापपर्यंत शासनाला तो अहवाल गेलेला नाही. मा.महपौर महोदय, बघा कामकाजाची काय पध्दत आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, सभागृहाचे मत आहे. आताच संजय घाडीगांवकर साहेबांनी पण सूचना दिली. एवढच आहे की, आपल्याला ज्या माणसाला मदत करायची असेल तर ती पूर्ण करतो. रणखांब साहेबांच्या अहवालाबाबत सांगितले, बीट मुकादमच्याबाबतीत झालं आपल्याला वाटत नाही ते गंभीर आहे? एका बीट मुकादमाला सांगायचे कुठल्याही अनिधकृत बांधकामाची नोंद मी जोपर्यंत सांगत नाही तोपर्यंत करु नकोस. म्हणजे सेटलमेंट करायला? एकाला नाही तर दहा लोकांना सांगितले. साहेब, दोन दिवसांपूर्वी आम्ही स्थायी समितीमध्ये चर्चा केली. शासनाने पूर्णपणे कार्यक्रम आखून दिला. नगरसेवक कुठल्याही

गोर-गरीबांच्या झोपडीवर कारवाई होत असेल तर म्हणतो अनधिकृत आहे. माफ कर, माणूसकीच्या दृष्टीने आम्ही तुझ्या बरोबर आहोत पण कायदयात आम्ही येऊ शकत नाही आम्हाला माफ कर. मा. महापौर महादोय, ही परिस्थिती आमची आहे. पण अशा खुर्चीवर बसून एवढा माज? आणि त्यानंतर सुध्दा कायदयात स्पष्टपणे उल्लेख, आताच घाडीगांवकर साहेबांनी दिलेले खुलासे, सन्मा.सभागृहनेत्यांनी दिलेली माहिती की, किती लोकांना तुम्ही तात्काळ निलंबित केले. आणि हयांच्यावर तीन महिन्यात तुमची कार्यवाहीच चालू आहे? साहेब, आपल्याला डेट मिळाली का? मॅडम, तुम्हाला उत्तर देण्यात रस नसेल तर सोडून दया आम्ही विषय सोडून देतो. सभा तहकूब करा. उदया मा. आयुक्त साहेब, आल्यावर चर्चा करु.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, अजून एक मुद्दा बाकी आहे तो पण पूर्ण होऊ दया. मा.महापौर महोदय, या ठिकाणी आयुक्त म्हणून बसलेले श्री. पाटील साहेब, हयांना कायदयाचे चांगले ज्ञान आहे. त्यांनी महाराष्ट्र पोलिसमध्ये सेवा केलेली आहे, प्रशासकिय सेवेमध्ये आहेत. राजीव साहेब, उत्तराखंडला डयुटीला गेल्यानंतर पाटील साहेबांकडे महापालिकेच्या आयुक्त पदाचा चार्ज होता. पाटील साहेब, बरोबर आहे? प्रभारी असेल किंवा तेवढया वेळेचा असेल पण चार्ज आयुक्त म्हणून होता. महापौर महोदय, विषय तोच आहे मी विषय फिरवत नाही. तुम्ही मुद्दा लक्षात घ्या. मा.महापौर महोदय, दिलीप शिंदे, उप खातेप्रमुख कळवा हॉस्पीटलला काम करत होते. त्यांची बदली मुंब्र्याला दाखविण्यात आली परंतू त्यांना तिथे हजर केले गेले नव्हते. त्यांची बदली रद्द झाली आणि ती घटना घडली त्यावेळी ते कळवा हॉस्पीटला काम करत होते. तरी देखिल दिलीप शिंदेना आदरणीय पाटील साहेबांनी आयुक्त म्हणून निलंबित केले होते. आणि ते प्रश्न मी महासभेमध्ये विचारले होते. त्यावेळी आयुक्त साहेबांना ती कल्पना आहे की, फक्त ऑर्डरमुळे त्यांना निलंबित केले होते. वास्तविक ते तिथे काम करत नव्हते ते कळवा हॉस्पीटलला काम करत होते. त्यांची ऑर्डर कळवा हॉस्पीटलचीच होती. तेंव्हा त्यांना कामावर हजर केले. त्यावेळी उप आयुक्त, अतिक्रमण म्हणून श्री. प्रकाश बोरसे साहेब होते आणि त्यानीच दिलीप शिंदेना निलंबीत करण्याचा अहवाल ठेवला होता. साहेब, माझे म्हणणे बरोबर आहे? साहेब मी बरोबर बोलतोय ना? मा. महापौर महोदय, आज हया ठिकाणी तीन-तीन अधिका-यांनी अहवाल ठेवलेत. महापालिकेच्या आयुक्तांनी स्वतः अहवाल पाठवला, शासनाने पत्र पाठविले. इथे आयुक्त अधिका-यांना निलंबित करत नाहीत. तत्कालीन आयुक्त उप आयुक्तांवर गुन्हा दाखल करायला शासनाकडे अहवाल पाठवत नाहीत. म्हणजे हा चौकशीचा फास नको असलेल्या म्हणजे आवडती आणि नावडती असा प्रकार करुन ठेवलेला आहे. मा.महापौर महोदय, ही गंभीर बाब आहे. आज महासभेत याबाबत निर्णय झाल्याशिवाय दुसरा विषय घेऊ नये अशी माझी आपणांस विनंती आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, एक म्हणजे त्यांनी डेट विचारली आहे ती सांगावी. आणि आपण तीन हजार पानांची चार शीट एका दिवसांत अभ्यास करुन सही करुन पाठवली होती. आणि एवढा गंभीर आरोप असताना आपण 397 अ चा (2) प्रमाणे कारवाई आपण अजून का प्रस्तावित करत नाही.

**श्री. अशोक वैती :-**

मा.महापौर महोदय, मला वाटते शहराचा विकास महत्वाचा आहे. सहा.आयुक्तांबाबत एवढी चर्चा चालू आहे. सहा.आयुक्त हे प्रथमदर्शनी दोषी आहेत हे सिध्द झाले आहे. प्रथमदर्शनी दोषी असल्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे याच्यामध्ये सहभाग आहे हे देखिल आताच सांगण्यात आले असे असताना कशाला याच्यात वेळ घालवत आहात. त्यांना आधी सस्पेंड करा आणि चौकशी लावा. कशाला वेळ घालवताय? निलंबित करा आणि चौकशी लावा. आता आम्हाला याच्यावर चर्चा नकोय निलंबित करा आणि चौकशी लावा. ते सहा.आयुक्त आता आम्हाला महत्वाचे नाहीत. आता या ठिकाणी आयुक्त साहेबांनी निर्णय घ्यावा. ठराव नकोय ऑर्डर पाहिजे. तुमच्याच रिपोर्टमध्ये त्यांना प्रथम दर्शनी दोषी धरलेले आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आम्हाला ऑर्डर पाहिजे आम्ही या ठिकाणी एवढी चर्चा केली. सिध्द झालेले आहे असे असताना तुम्ही कारवाई करत नाही म्हणजे तुम्ही त्यांना पाठींबा देत आहात.

**मा.सभागृहनेते :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, या ठिकाणी तुम्ही मंगल शिंदे, मनिष जोशी, हया लोकांना तात्काळ सस्पेंड केले आहे. मग हयांना का करत नाहीत? रणखांब साहेबांनी दिलेला अहवाल खोटा आहे का? बुरपल्ले साहेबांनी दिलेला अहवाल खोटा आहे? तुमचा त्यांच्यावर विश्वास नाही का? तुमच्यावर कोणाचा दबाव आहे सांगा. प्रभाग समितीच्या मिटींगला सुध्दा अधिकारी उपस्थित रहात नाहीत.

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, कुठल्या कायदयाखाली तुम्ही कारवाई करु शकत नाही. आम्ही दिलेले कायदे खोटे आहेत. इथे बसायचा तुमच्याकडे अधिकारी नसेल तर आयुक्त साहेबांनी फोनवर बोलून घ्या.

**मा.सभागृह नेते :-**

नाहीतर रणखांब साहेबांनी पूर्ण लेटर वाचून दाखवा.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, उप आयुक्त रणखांब साहेबांचा अहवाल वाचावा सभागृहाला कळू दया काय चालले आहे ते. बीट मार्शलचा रिपोर्ट पण वाचा.

**श्री. अशोक वैती :-**

मा.सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते साहेब, हया सभागृहात जर एखादया अधिका-याला पाठीशी घालण्यात येत असेल तर अशा अधिका-यांवर पण आपण कारवाई करु शकतो. अहवालामध्ये जर डिटेल आले असेल आणि अशा अधिका-याला जर पाठीशी घालण्यात येत असेल तर अशा अधिका-यांवर सुध्दा 56 (1) नुसार कारवाई झाली पाहिजे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

परिमंडळच्या उप आयुक्तांनी अनियमितता सिध्द झाली झाली म्हणून त्यांनी अहवाल दिलेला आहे. 56 (1) आरामात लागू होतो. तुम्ही कारवाई का करत नाही आणि आम्हाला उत्तर का देत नाहीत?

**मा.आयुक्त सो. (मा.अतिरिक्त आयुक्त )**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी सभागृहाने ज्या काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्या सर्व टिपण्णी स्वरुपात मी मा.आयुक्त साहेबांना सादर करतो.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, हे सभागृह आहे आणि आपण कायदयाच्या आधारे कारवाई मागितली आहे. आयुक्त म्हणून आपण त्या खुर्चीवर बसून कारवाई करणार की नाही त्या विषयावर बोला. आम्हाला कोणाची मेहरबानी किंवा भीग नकोय. आम्ही कायदयाच्या आधारावर बोलतोय. कायदा चुकलाय तो कलम लागू नसेल तर स्पष्टपणे सांगा मिनिटस् करुन घ्या. तुम्हाला अनधिकृत बांधकामला पाठींबा देतो हे सिध्द होईल.

**मा.आयुक्त सो. (मा.अतिरिक्त आयुक्त )**

मा.महापौर महोदय, याच्यामध्ये पाठींबा देणे किंवा न इदेणे हा इश्यू नाही. या संदर्भात कार्यवाहीची एक विशिष्ट पध्दती असते. तयानुसार मा.आयुक्त महोदय, त्याबाबत निर्णय घेत असतात. ही सगळी फाईल मी उदया सकाळी मा.आयुक्त महोदयांकडे सादर करतो.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, हयापुढे सभागृह लावू नका. सकाळपासून आम्ही इथे कशाला बसलोय?

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी एका सहा.आयुक्ताच्या विरोधात उप आयुक्त किंवा इतर सहा.आयुक्त तीन-तीन महिन्यापूर्वी तुमच्याकडे अहवाल सादर करतात. एकीकडे तुम्ही खातेनिहाय चौकशीची वार्ता करता पण साधी नोटीस सुध्दा तुम्ही त्यांना देत नाहीत. पण हयाच महापालिकेत साध्या पेपरमध्ये आलेल्या बातम्यांवर हया महापालिकेत वर्षानुवर्ष काम केलेले, हया शहराच्या विकासासाठी ज्यांनी घाम गाळला आहे आणि त्यांच्या नोकरीची दोन-तीन वर्ष बाकी आहेत अशा कित्येक अधिका-यांना तुम्ही तात्काळ सस्पेंड करुन घरी बसवलेले आहे. त्यावेळी कायदया कुठे होता, कोणाच्या दबावाखाली हा निर्णय तुम्ही घेताय? तुम्ही त्या अधिका-याची त्या वॉर्ड ऑफिसमध्ये जाऊन चौकशी करा. प्रत्येक कर्मचा-याला वैयक्तीकरित्या बोलवा तेंव्हा तुम्हाला कळेल तो अधिकारी कसा वागतोय ते. आम्ही वारंवार तुमच्या कानावर घातलेले आहे. तुमच्या उप आयुक्तांचा अहवाल आहे आणखिन कोणाचा अहवाल पाहिजे? आणि जर त्या उप आयुक्तांचा अहवाल चुकीचा असेल तर त्या उप आयुक्तांवर तुम्ही कारवाई करणार आहात का?

**श्री. नजीब मुल्ला :-**

म्हस्के साहेब, तुम्हाला डेट मिळाली का?

**मा.सभागृह नेते :-**

नाही मिळाली. डेट देत नाहीत.

**श्री. नजीब मुल्ला :-**

डेट दया आणि तुमच्याकडे कधी आला ती डेट दया. आतापर्यंत चार वेळा सांगितले.

**मा.सभागृह नेते :-**

तुम्हाला जर निर्णय घ्यायचे नसतील तर तुम्ही इथे आयुक्त म्हणून बसू नका.

**श्री. अशोक वैती :-**

दिक्षीत मॅडम, आम्हाला निर्णय हवाय चर्चा नकोय.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, हया ठिकाणी झालेली चर्चा कायदेशीर आहे आणि विधी सल्लागार इथे उपस्थित आहेत. जर बेकायदेशिर असेल तर विधी सल्लागार हयांनी सांगावे.

**कार्मिक अधिकारी :-**

मा.महापौर महोदय, हा रिपार्ट आमच्याकडे 12/05/2014 ला आला आहे. आणि त्यांची तारीख 09/05/2014 आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, 12/052/014 ला हयांच्याकडे आला. आता हयांच्यावर पण कारवाई घ्या. मा. महापौर महोदय, एवढया गंभीर स्वरुपाचे आरोप ठेवल्यानंतर सुध्दा गांभिय नाही.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, महाराष्ट्र शासनाकडून आलेल्या अधिका-यांना सांभाळायचे आणि वर्षानुवर्षे घाम घालणा-या अधिका-यांना घरी बसवायचे हा कुठला नियम आहे?

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, कलम 397 आणि 56 (1) का लागू केला नाही त्याचे उत्तर अपेक्षित आहे.

**(मा.अतिरिक्त आयुक्त साहेब, मा.आयुक्त साहेबांशी फोनवर संपर्क साधण्यासाठी सभागृहाबाहेर जातात. उप आयुक्त रणखांब मा.आयुक्त साहेब यांच्या आसनावर बसतात.)**

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

रणखांब साहेब, तुम्ही आता इथे आयुक्त म्हणून बसला आहात. आमच्या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला आयुक्त म्हणून दयावी लागतील.

मा.महापौर महोदय, तत्कालीन उप आयुक्त बोरसे आणि अंडे मॅडम हयांना वाचवण्यामध्ये हे सगळे कामाला लागतील.

**श्रीम. विमल भोईर :-**

मा.महापौर महोदय, मा.अतिरिक्त आयुक्त साहेब, येईपर्यंत आपण विषयाला सुरुवात करावी. वेळ असाच वाया जात आहे. आमचे बरेच विषय प्रलंबित आहेत.

**श्रीम. आशा कांबळे :-**

मा.महापौर महोदय, विषयाला सुरुवात करण्यापूर्वी मला सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट आणायची आहे. आजच्या पेपरमध्ये बातमी आहे की, वागळे आगार येथे डेंग्यू सदृश्य चार-पाच पेशंट निदर्शनास आले आहेत. आपल्या वागळे आगारात कमित कमी सातशे ते आठशे निकामी टायर आहेत. अशा हया टायरमध्ये मोठया प्रमाणांत पाणी साचलेले असते. आपली महापालिका जाहिरात करते करवंटीमध्ये सुध्दा पाणी साठू देऊ नका. त्यासाठी आपण खर्च करतो. मग त्या टायरची विल्हेवाट लावण्यासाठी आपण काही उपाययोजना करु शकत नाही का? मा.महापौर महोदय, आज मी त्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेले होते. परिवहनचे टेकाळे साहेब तिथे उपस्थित होते मी त्यांना विनंती केली माझ्याबरोबर पाहणीसाठी या परंतू ते ऑफिसमध्ये उपस्थित असताना सुध्दा आले नाहीत. जर लोकप्रतिनिधीशी ते असे वागत असतील तर सर्वसामान्य नागरिकांशी कसे वागत असतील? माझ्या समोरुन ते गाडी घेऊन गेले त्यांना दोन मिनिटं तिथे माझ्याबरोबर थांबता आले नसते का? महापौर महोदय, मी त्यांना विनंती केली होती.

**परिवहन व्यवस्थापक, श्री. टेकाळे :-**

मा.महापौर महोदय, सकाळी मॅडम वागळे डेपोमध्ये आल्या होत्या. मॅडम आल्याचे मला त्यांच्या प्रतिनिधीनी फोनवर सांगितले. त्यावेळी माझ्यासमोर 40- 50 कर्मचारी होते. बुरपल्ले साहेब आम्ही सगळे तिथे होतो आमची चर्चा चालू होती तेवढयात फोन आला. मी सांगितले की, कर्मचारी माझ्यासमोर आहेत आणि माझ्यासमोर गर्दी आहे आणि हा विषय संपल्यावर मी आपल्याला फोन करतो. आमची त्या ठिकाणी जवळ जवळ तासभर चर्चा चालू होती आणि दरम्यानच्या काळात महासभा सुरु झाल्याचे मला समजले. मी घाई-घाईत खाली उतरलो आणि सांगायचे म्हणजे मी विसरलो. आणि इथे आल्याबरोबर मी मॅडमना फोन केला मॅडम मी आपल्याला फोन करायचा विसरलो.

**श्रीम. आशा कांबळे :-**

म्हणजे आणी कृती करायची आणि नंतर सांत्वन करायचे का?

**परिवहन व्यवस्थापक, श्री. टेकाळे :-**

तसे नाही, माझा तसा काहीच हेतू नव्हता.

**श्रीम. आशा कांबळे :-**

ठिक आहे, मला त्याच्याशी काही देणे घेणे नाही. मला टायरबाबत बोलायचे आहे.

**श्री. सुहास देसाई :-**

मा.महापौर महोदय, लोकप्रतिनिधी हयांना भेटायला थांबलेत आणि हे चक्क विसरतात?

**परिवहन व्यवस्थापक, श्री. टेकाळे :-**

मा.महापौर महोदय, मी इथे आल्यावर आधी मॅडमना फोन केला की, मॅडम आपण डेपोमध्ये आहात की कुठे आहात? भेट टाळायची वगैरे माझा उद्देश नव्हता.

**श्रीम. आशा कांबळे :-**

डेपोमध्ये असलेल्या टायरतमध्ये पाणी साचते आणि तिथे मलेरिया किंवा डेंग्यूच्या जंतूचा तिथे प्रादुर्भाव होतो त्यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहात का? कारण हयाबाबत मी दोन-तीन वेळा पत्रव्यवहार सुध्दा केलेला आहे.

**परिवहन व्यवस्थापक, श्री. टेकाळे :-**

मा.महापौर महोदय, आताच आपण दोन ते अडीच हजार टायर लिलावात दिले आणि अजून काही टायर निघाले आहेत ते आपण मागे टाकलेले आहेत. त्यांचा प्रस्ताव सुध्दा आपण येणा-या महासभेपुढे घेणार आहोत. दरम्यानच्या काळात तिथे फवारणी करुन डास उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घेऊ.

**श्रीम. आशा कांबळे :-**

म.महापौर महोदय, मला असे वाटते आपण एवढा खर्च करतो. जर तिथे आपण शेड टाकली तर पावसाळयात त्या टायरमध्ये पाणी साचणार नाही.

**परिवहन व्यवस्थापक, श्री. टेकाळे :-**

जी काही उपाययोजना असेल ती आपण करु घेऊ.

**श्रीम. आशा कांबळे :-**

मा. महापौर महोदय, आरोग्य केंद्राला आपण जी गाडी देतो त्याबाबत मला बोलायचे होते की, प्रत्येक आरोग्य केंद्राला आपण स्वतंत्र गाडी देतो की विभागून देता याबाबत मला माहिती मिळावी.

**मा.आयुक्त सो. (मा.अतिरिक्त आयुक्त ):-**

मा.महापौर महोदय, हया प्रकरणी मी आपल्याला म्हटले होते की, हया प्रकरणी कारवाईसाठी फाईल आस्थापना विभागाकडे पाठवली आहे. मधल्या काळात थोडा विलंब झाला असेल. हया अनुषंगाने आपण म्हटल्याप्रमाणे मी मा.आयुक्त महोदयांशी चर्चा केली आणि आयुक्त महोदयांना आपल्या सभागृहाच्या भावना सांगितल्या. मा.आयुक्त महोदय,म्हणाले की, हया संदर्भातील सर्व कागदपत्र माझ्याकडे सादर करा. मी शहानिशी करुन तत्काळ हयाबाबतचा निर्णय घेतो.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आज मा.आयुक्त साहेब कुठे आहेत? ते आज महापालिकेत आले नाहीत का? मंत्रालयामध्ये आहेत. मा. महापौर महोदय, सदर प्रस्तावाची नस्ती तीन-तीन महिने हयांच्याकडे प्रलंबित आहे. एवढी उदाहरणं दिली. आता अजून एक उदाहरण देतो. बघा हे कारवाई करतील की नाही? आणि बघा हयांच्याबद्दल आम्हाला किती संशय आहे. मा.महापौर महोदय, बायोमॅट्रीक सर्व्हेक्षणामध्ये 67 लाख रुपये जादा वाटले गेले. वाढीव बिले दिली गेली. याबाबत तत्कालीन आयुक्त राजीव साहेबांनी ऑडीटरचा रिपोर्ट मागवला, कार्मिक विभागाचा रिपोर्ट मागवला. आणि परत आयुक्तांचे लेखी आदेश आहेत की, संबंधितांवर कारवाई करा. तेंव्हाचे समाज विकास विभागाचे उप आयुक्त श्री. बोरसे साहेब, श्री. पाटोळे आणि संबंधित लिपिक ती पण कारवाई आतापर्यंत प्रलंबित ठेवली आहे. मा.महापौर महोदय, कारवाई करण्याचा हा फक्त फार्स आहे. आणि जो अधिकारी इथे आयुक्त म्हणून बसतो त्याची ती कायदेशीर

जबाबदारी असते की, सभागृहात विचारलेल्या प्रश्नांना, मांडलेल्या मुद्दयांना आणि उपस्थित झालेल्या मुद्दयांना खुलासा देणे व तसे संबंधित आदेश निर्गमित करणे. कारण इथे बसणारी व्यक्ती ही आयुक्त असतो आणि आयुक्तांच्या भुमिकेतून ते प्रशासनाची बाजू मांडत असतात. तशी नियमावली आहे आणि आपणही सभेचे कामकाज नियमावलीप्रमाणे चालवतो. त्यामुळे आता सर्व मुद्दे क्लीअर झालेले आहेत, कुठलाही किंतू-परंतू उरलेला नाही. म्हणून आपण संबंधितना आदेश दयावेत की, तात्काळ कारवाई आता इथे घोषित करावी. आणि मग पुढील कागदोपत्री सोपस्कार नंतर करण्यात यावेत. मा. महापौर महोदय, मी सभागृहनेते आणि विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो की, मी जी विनंती मांडलेली आहे ती योग्य असेल, कायदयामध्ये बसत असेल तर आपण त्याबाबत पाठपुरावा पुढे सांगावा. धन्यवाद.

**श्रीम. आशा कांबळे :-**

मा.महापौर महोदय, मला आरोग्य केंद्राच्या वाहनाबद्दल सांगा.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

कांबळेताई आधी हा विषय क्लीअर करुन घेऊ. मा.महापौर महोदय, हया ठिकाणी जी व्यक्ती आयुक्त म्हणून बसते तिची कायदेशीर ती जबाबदारी असते की, सभागृहात उपास्थित झालेल्या मुद्दयांबाबत निर्णय घेणे, अहवाल देणे आणि कार्यवाही करणे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, सन्मा.सदस्य, श्री. संजय घाडीगांवकर हयांनी सांगितल्याप्रमाणे तसेच हया विषयावर सभागृहात ब-याच वेळा चर्चा झालेली आहे. मा.स्थायी समितीमध्ये झाली आणि सभागृहामध्ये पण चर्चा झाली आहे. या ठिकाणी सभागृहात आयुक्तांच्यावतीने जो अधिकारी बसत असेल तते पूर्णपणे मा.आयुक्त म्हणून तिथे बसत असतात. त्यामुळे आयुक्त साहेबांची पूर्ण अधिकार त्यांना आहेत असे निश्चितप्रकारे या सभागृहामध्ये निवेदन झालेले आहे. आणि प्रशासनाच्यावतीने सुध्दा तसे उत्तर मिळाले आहे. त्यामुळे मला वाटते तो विषय चर्चेचा होऊ शकणार नाही. ज्या खुर्चीवर ते बसले आहेत ते मा.आयुक्तच आहेत असे सभागृह निश्चितपणे मानत असते.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेबांना आदेश दयायला सांगा.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, मला एक समजत नाही. या ठिकाणी एवढा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे दोन-चार तास चर्चा चालू आहे. मा.महापौर महोदय, या ठिकाणी दोन गोष्टी एकदम स्पष्ट झालेल्या आहेत की, संबंधित अधिका-याकडून त्या ठिकाणी अनियमितता झालेली आहे.

**श्री. अशोक वैती :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी प्रशासन जर सक्षम नसेल आणि जसे जगदाळे साहेबानी आणि घाडीगांवकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे मा.आयुक्त म्हणून हया ठिकाणी बसल्यानंतर पूर्णपणे अधिकार त्यांचा असतो. त्यांना निर्णय घेण्याची तेवढी पॉवर असते. आणि सभागृह देखिल आपल्या पाठीशी आहे असे असताना देखिल या ठिकाणी निर्णय होत नसतील तर हे चुकीचे आहे. मला वाटते हयाच्या निषेधार्त आजची सभा हया ठिकाणी तहकूब करावी अशी विनंती आहे.

**मा.सभागृह नेते :-**

कोर्टाचा जो विषय आहे तो आज सकाळी तुम्ही आम्हाला दिलेला आहे. त्यामुळे आमचा अभ्यास झालेला नाही. कोर्टाचा निर्णय आहे आणि आम्हाला अभ्यास करणे गरजेचे आहे. आणि तो पाहून आम्हाला असे वाटते की, ती अन्यायकारक चौकशी झालेली आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय पुढे आणा आता आमचा अभ्यास झालेला नाही. आम्हाला अभ्यास करावा लागेल असा काही आम्ही निर्णय देणार नाही. मा.महापौर

महोदय, हया ठिकाणी सन्मा. अशोक वैती साहेबांनी जी सूचना मांडलेली आहे. ज्या ठिकाणी प्रशासनाच्या अधिका-यांवर विश्वास नाही. उप आयुक्त अहवाल देतात आणि प्रशासन त्याच्यावर कारवाई करत नाही. त्यामुळे प्रशासनाचा निषेध. अनधिकृत बांधकाम करणा-या अधिका-याला प्रशासन पाठीशी घालतं म्हणून आम्ही निषेध करतो आणि आजची ही सभा आम्ही तहकूब करतो.

**मा.महापौर सो.**

सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आजची ही सभा तहकूब करतो. उदया सकाळी ठिक 11.00 वाजता आपण सभा चालू करणार आहोत.

**(मा.महापौर महोदय, सभा तहकूब केल्याचे घोषित करतात.)**

**(सौ.छाया प्र. मात्रेकर)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकुब झाल्याची वेळ सायं. ०५.३५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -२०/०८/२०१४**

सही/-
**(हरिश्चंद्र श्रीपत पाटील)**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**